सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, २६ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३०२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# उत्पादन विस्तारासाठी टॉरल इंडियाचा महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करार

## १२,००,००० चौरस फूट उत्पादन सुविधेचा विस्तार, १२०० हून अधिक रोजगाराच्या संधी निर्माण होणार

दावोस, स्वित्झर्लंड : जानेवारी, २०२५: जागतिक स्तरावरील अग्रगण्य इंटिग्रेटेड अल्युमिनियम कास्टिंग फाउंड्री असलेल्या टॉरल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने सुपा (अहिल्या नगर, महाराष्ट्र) येथील १२,००,००० चौरस फूट उत्पादन सुविधेचा विस्तार करण्यासाठी महाराष्ट्र सरकारसोबत एक ऐतिहासिक सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. हा सामंजस्य करार वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमदरम्यान दावोस येथील महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये झाला, ज्यामध्ये माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि अन्य वरिष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते. या सुविधेमुळे १२०० हून अधिक स्थानिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, या भागातील समुदायाच्या प्रगतीसाठी एक परिवर्तनकारी पाऊल उचलले गेले आहे.



भरत गिते, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, टॉरल इंडिया, या उपक्रमाबद्दल बोलताना म्हणाले, महाराष्ट्रातील एका छोट्या शहरातून आल्यामुळे, मी नेहमीच टियर खख भागातील अफाट क्षमतेवर विश्वास ठेवला आहे आणि त्यांच्या प्रगतीसाठी संधी शोधण्याचा निर्धार केला आहे. २०२० मध्ये मी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजींना भेटलो तेव्हा त्यांच्याशी या दृष्टिकोनाबद्दल चर्चा करण्याचे भाग्य मला मिळाले आणि आज त्यांच्याच दूरदृष्टीमुळे हे स्वप्न साकार होत असल्याचे पाहून मला अभिमान वाटतो. या भागात जागतिक दर्जाचे कौशल्य आणि तंत्रज्ञान विकसित करून, जागतिक दर्जाची पायाभूत संस्कृती प्रस्थापित करण्याचा आम्हाला विश्वास आहे. स्थानिक क्षेत्रामध्ये जागतिक कौशल्य आणि नवकल्पनांचे संयोजन करून, सुपाला उत्पादनाचे केंद्र म्हणून विकसित करण्याचे आमचे ध्येय आहे आणि या भागाच्या विकासासाठी नवीन मानके स्थापित करण्याचा प्रयत्न करत आहोत. सुपा हे एक धोरणात्मक स्थान असून, प्रमुख बाजारपेठांच्या जवळ असल्यामुळे प्रगत उत्पादनाचे एक केंद्रबिंदू म्हणून ओळखले जाते. टॉरल इंडियाने या भागात विस्तार करण्याचा निर्णय घेतल्याने अहिल्या नगरच्या ऊर्जा, संरक्षण, एरोस्पेस, रेल्वे, सागरी, आरोग्यसेवा आणि इतर उच्च-विकास क्षेत्रांमध्ये भारताला पाठिंबा देण्याच्या क्षमतेवरील विश्वास दिसून येतो.

टॉरल इंडियाकडे ॲल्युमिनियम सँड-कास्टिंग सोल्यूशन्समध्ये उत्पादन डिझाइनपासून ते गुणवत्तेची चाचणी, पेंटिंग, उत्पादन बांधणी, असेंब्ली आणि वितरणापर्यंत एकाच ठिकाणी सेवा पुरविण्याचा सिद्ध ट्रॅक रेकॉर्ड आहे. पुण्यातील त्यांच्या प्रमुख सुविधेद्वारे त्यांनी अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सेवा पुरवल्या आहेत.

# आपली लोकशाही सर्व समावेशक : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

### राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात संपन्न

नवी दिल्ली : आपली लोकशाही जगातील सर्वात जुनी लोकशाही आहे. सोबतच ती जगातील सर्वात मोठी, वैविध्यपूर्ण, तरुण, सर्वसमावेशक आणि संवेदनशील लोकशाही असून आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले. राष्ट्रीय मतदार दिनानिमीत्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. देशात निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी अनुकरणीय कामगिरी केलेल्या राज्य आणि जिल्हा अधिकाऱ्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते सर्वोत्कृष्ट निवडणूक पद्धती पुरस्कार प्रदान केले गेले.

## प्रजासत्ताक दिनासाठी दिल्लीत सहा पदरी संरक्षण व्यवस्था

नवी दिल्ली : भारत रविवार २६ जानेवारी २०२५ रोजी ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहे. कर्तव्य पथावर विजय चौक ते इंडिया गेट असे पथसंचन होणार आहे. या सोहळ्यासाठी दिल्लीत सहा पदरी संरक्षण व्यवस्था आहे. जमिनीपासून आकाशापर्यंत चोख बंदोबस्त आहे. कोणतीही अप्रिय घटना होऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे.

कर्तव्य पथाबाहेरील भागाचे संरक्षण १५ हजार जवान करणार आहेत. यात दिल्ली पोलीस, राखीव पोलीस कंपन्यांचे जवान, शीघ्र कृती दलाचे जवान, स्वॅट कमांडो, बॉम्ब शोधून निकामी करणारे पथक आणि वाहतूक पोलीस यांचा समावेश आहे. दिल्लीत येण्याजाण्याचे सर्व मार्ग सील करण्यात आले आहेत. तपासणी शिवाय कोणालाही दिल्लीत किंवा दिल्लीबाहेर जाण्यास मनाई आहे.


राष्ट्रपती भवन, लाल किल्ला अशा महत्त्वाच्या ठिकाणी निमलष्करी दलाचे जवान बंदोबस्तासाठी नियुक्त करण्यात आले आहेत. दिल्लीत येण्याजाण्याचे मार्ग आणि महत्त्वाचे रस्ते येथे नाकाबंदी करण्यात आली आहे. ठिकठिकाणी कृत्रिम अडथळ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. महत्त्वाच्या ठिकाणी कोणतेही वाहन बंदोबस्तावरील जवानांच्या परवानगीशिवाय भरधाव वेगाने जाऊ नये यासाठी खबरदारी घेतली जात आहे.

मान्यवरांच्या संरक्षणाची जबाबदारी तिन्ही दलाचे निवडक जवान, एनएसजी, केंद्रीय संरक्षण यंत्रणांचे जवान आणि कमांडो यांच्याकडे असेल.












सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



खुलताबाद : आज रोजी किड्स् एम पायर इंग्लिश स्कूल मध्ये विज्ञान प्रदर्शन मध्ये अरहान मुजाहिद धनंजकर वर्ग ५ वा याने चांद्रयान -३ चे प्रोजेक्ट बनवले माजी सभापती दिनेश आभारी भाजप. जिल्हा उप अध्यक्ष प्रकाश वाकाळे मा नगर सेवक, आबास बेग पत्रकार संतोष करपे पाटील मान्यवराणी अभिनंदन केले त्यात शाळेचे मुख्यधयंपाक आशरफ खान अवेज सर्व शिक्षक व सरफराज भाई अखिल शेख अन्वर जाहगीरदार मुजू भाई आदी उपस्तित होते.

# शेतमालाला रास्त भाव व रोख रक्कम देण्यासह त्यांना विविध सोयीसुविधा देण्यासाठी प्रभावी नियोजन केले पाहिजे : आ.अब्दुल सत्तार

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२५ जानेवारी

कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांचे पवित्र मंदिर असून त्याचे पावित्रा जपण्यासाठी संचालक मंडळाने शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव व रोख रक्कम देण्यासह त्यांना विविध सोयीसुविधा देण्यासाठी प्रभावी नियोजन केले पाहिजे असे मत माजीमंत्री आमदार अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केले.

शेतकऱ्यांना केंद्र बिंदू मानून सोयगाव तालुक्यासाठी सर्वाधिक निधी उपलब्ध करून दिला. सोयगाव उपबाजारात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही अशी ग्वाही माजीमंत्री आ.अब्दुल सत्तार यांनी दिली.

सोयगाव येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात कार्यालय ईमारत,संरक्षण भिंत,व्यापार संकुल,सिमेंट रस्ता , प्रवेशद्वार अशा जवळपास ३ कोटी ५० लाख रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार अब्दुल सत्तार यांच्याहस्ते संपन्न झाले.त्यानंतर भूमिपूजन सोहळा निमित्त बाजार समितीच्या आवारात आयोजित सभेला संबोधित करतांना आमदार अब्दुल सत्तार बोलत होते.



याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे,उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख तथा माजी सभापती राजेंद्र राठोड, नगराध्यक्षा आशाबी तडवी,उपनगराध्यक्षा सुरेखाताई प्रभाकर काळे,माजी जि.प.सदस्य गोपीचंद जाधव गटनेता अक्षय काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलत असतांना आ.अब्दुल सत्तार म्हणाले की, शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन सोयगाव बाजार समितीचे सिल्लोड बाजार समितीत विलीनीकरण केले.सोयगाव बाजार समितीच्या आवारात पायाभूत सुविधा निर्माण करू अशी घोषणा निवडणूकीपूर्वी दिली होती.त्याची पूर्तता आज होत असल्याचे आ.अब्दुल सत्तार म्हणाले.विकास कामांची माहिती देतांना आ.अब्दुल सत्तार म्हणाले की,नागरिकांचे शासन स्तरावरील कामे तत्परतेने व्हावीत यासाठी सरकारी कार्यालय एका छताखाली याव्यात यापद्धतीने नियोजन केले आहे.सोयगाव तालुक्यात रोजगाराची शाश्वत साधने नसल्याने येथे शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून विकास कामे केली. कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी जिनिंग प्रेसिंग उभारली त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.विकास कामात पक्षपात केला नाही,१८ तास लोकांची कामे केली.

तरी देखील मतदार लोकांच्या भूलथापांना बळी पडतात.याची खंत व्यक्त करीत आ.अब्दुल सत्तार यांनी विधानसभेत कमी मताधिक्य मिळाल्याची नाराजी व्यक्त केली.कार्यकर्त्यांचा विश्वास आणि मेहनत व मतदारांचा विश्वास यावर आपण निवडून आलो असे स्पष्ट करीत आपण जनतेचे सेवक आहोत आणि कायम जनतेची सेवा करीत राहू मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कमी पडणार नाही अशी ग्वाही आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली.आयुष्यात कधीच विकास कामे केली नाही,ते लोक रस्ता कामाच्या भूमिपूजनाला विरोध करतात.आंदोलन कुठं करावं याच देखील भान काही लोकांना नाही मी जर चुकून पराभूत झालो असतो तर मंजूर रस्त्यांचा निधी देखील अशा लोकांना आणता आला नसता अशा शब्दात आ.अब्दुल सत्तार यांनी सोयगाव शेंदुर्णी रस्ता कामाला विरोध करणाऱ्या विरोधकांना टोला लगावत जोरदार समाचार घेतला.कार्यक्रमाचे प्रस्ताविक सभापती केशवराव पा. तायडे यांनी केले. सूत्रसंचालन ड.योगेश पाटील यांनी तर शेवटी संचालक नंदकिशोर सहारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रमास बाजार समितीचे उपसभापती दारासिंग चव्हाण,संचालक दामू अण्णा गव्हाणे,प्रभाकर (आंबा) काळे,जयराम चिंचपुरे,श्रीरंग पा.साळवे,कौतिकराव मोरे, सतीश ताठे,विश्वास दाभाडे,राजाराम पाडळे,संदीप राऊत, रमेश लाठी,भाऊराव लोखंडे,शेख जावेद,शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार,नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक विठ्ठल सपकाळ,शिवसेना जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल,शिवाप्पा चोपडे,राजू बाबा काळे,सांडू तडवी,रमेश जावळे,शांताराम चौधरी,माजी सभापती धरमसिंग चव्हाण,द्रोपदाबाई सोनवणे,सुरेखाबाई तायडे,सुशिलाबाई इंगळे,शिवसेना शहरप्रमुख संतोष बोडखे,फिरोज पठाण,जीवन पाटील,राहुल सपकाळ,राजू मिया देशमुख,सलीम खा पठाण,डॉ. देशमुख,पंकज जयस्वाल,मोतीराम पंडित,पांडुरंग जैवळ,शिवदास राजपूत, भारत तायडे,श्रावण राठोड,रमेश गावंडे,गुलाब राणा, ज्ञानेश्वर वरांगणे,भगवान वरांगणे,कॅप्टन कादरी,कुणाल राजपूत,सुरेश चव्हाण,विजय तायडे,इलियास पठाण, हरिभाऊ चव्हाण,विशाल चव्हाण,अमोल मापारी,राधेश्याम जाधव,गणेश राठोड,रमेश भंगी,दिलीप देसाई,महंमद देशमुख,सांडू मानसिंग,विकास काळे,मकरंद राठोड, समाधान काळे,नगरसेवक रउफ देशमुख,दीपक पगारे, अशोक खेडकर,राजू दुतोंडे,भगवान जोहरे,कदीर शहा, रउफ शेख,गजानन कुडके,किशोर मापारी,हर्षल काळे, संदीप सुरडकर,डॉ.हर्षल सोळंके,नारायण घनगाव,सिताराम जाधव,समाधान काळे,रवींद्र बावस्कर,विलास शिंदे,शेख मुख्तार,मेघराज राठोड आदींसह परिसरातील शेतकरी, नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## विळदघाट येथे जिल्हास्तरीय दिव्यांग मुलामुलींसाठी क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन

नगर (प्रतिनिधी)- सोमवार व मंगळवार, दि. २७ व २८ जानेवारी २०२५ रोजी जिल्हास्तरीय दिव्यांग मुलामुलींसाठी क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांचे आयोजन जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, स्पेशल ओलंपिक भारत (अहिल्यानगर), जिल्हा क्रिडा विभाग आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद (अहिल्यानगर) यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

ही स्पर्धा अभियांत्रिकी महाविद्यालय क्रिडांगण, इंग्लिश मीडियम स्कूल क्रिडांगण, आणि डॉ. विखे पाटील स्पोर्ट्र्स कॉम्प्लेक्स, अहिल्यानगर येथे सकाळी ठीक ९:०० वाजता सुरू होईल.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मा. डॉ. सुजयदादा विखे पाटील, मा. धनश्रीताई विखे पाटील (अध्यक्षा, स्पेशल ओलंपिक भारत, अहिल्यानगर), जिल्हा समाज कल्याण अधिकारी आणि विखे पाटील फाउंडेशनचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

याशिवाय, २७ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी ठीक ४:०० वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले आहे.

## जिल्हा नियोजन समितीची 1 फेब्रुवारी रोजी बैठक

अहिल्यानगर दि.२४- राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांनी कळविले आहे.

## महाराष्ट्र केसरी स्पर्धा जिल्ह्याच्या क्रीडा विकासाचे पहिले पाऊल - पालकमंत्री

अहिल्यानगर दि.२५- राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वाडिया पार्क येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या मैदानाची पाहणी केली. जिल्ह्यात नव्याने सुरू झालेल्या क्रीडा विकासाच्या पर्वाचे महाराष्ट्र केसरी स्पर्धा पहिले पाऊल आहे, असे श्री.विखे पाटील यावेळी म्हणाले.

त्यांच्या समवेत आमदार संग्राम जगताप, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आदी होते.

पालकमंत्र्यांनी स्पर्धा आयोजनाची माहिती घेतली. स्पर्धेच्या वेळी कुस्तीच्या आखाड्याभोवती प्रेक्षकांची गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. स्पर्धेसाठी येणारे मल्ल, पंच आणि पदाधिकाऱ्यांची चांगली व्यवस्था करावी. कुस्तीगीरांना कोणतीही अडचण येणार नाही याकडे विशेष लक्ष द्यावे. स्पर्धा स्मरणीय होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असे आवाहन त्यांनी केले.

तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाडिया पार्क येथील क्रीडा सुविधांसाठी ५० कोटी रुपये मंजूर केले आहे. यातील २० कोटीचा निधी पहिल्या टप्प्यात प्राप्त होत आहे. यातून दर्जेदार सुविधा निर्माण कराव्या. आवश्यकता असल्यास अधिक निधी देण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

आमदार जगताप यांनी कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाची माहिती दिली. ८०० पेक्षा अधिक कुस्तीगीर, १५० पंच आणि २०० पेक्षा अधिक पदाधिकारी स्पर्धे साठी येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

यावेळी अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे संतोष भुजबळ, शिवाजी चव्हाण, अर्जुन शेळके, युवराज करुजले उपस्थित होते.

कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

जाहीर प्रगटण

प्रकरण : गाळा हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सर्व्हे नं. ७७ नवा मोंढा, हिंगोली यांना कळविण्यात येते की, कै. मुरलीधर किशनचंद मुंदडा, रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली च्या हद्दीतील मोहल्ला नवा मोंढा हिंगोली येथील सर्व्हे नं. ७६ गाळा क्र. ४१ व सर्व्हे नं ७७ गाळा क्र. ३३, पहील्या मजल्यावरील सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे ज्याची लांबी दक्षिण-उत्तर २५ फुट म्हणजेच ७.६२ मीटर व रुंदी: पुर्व-पश्चिम १२ फुट म्हणजेच ३.६५ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३००.०० चौरसफुट म्हणजेच २७.८१ चौरसमीटर ज्याची चतुःसिमा पुर्वेस व दक्षिणेस बिल्डींगची हद्द पश्चिमेस गाळा क्रं ४०, उत्तरेस : गाळा क्रे ४२ वरील चर्तु-सिमेच्या आतील गाळा क्रं. ४१ व ज्याची लांबी दक्षिण-उत्तर २५ फुट म्हणजेच ७.६२ मीटर व रुंदी: पुर्व-पश्चिम १२ फुट म्हणजेच ३.६५ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३००.०० चौरसफुट म्हणजेच २७.८१ चौरसमीटर ज्याची चतुःसिमा पुर्वेस गाळा क्रं ३४, पश्चिमेस : गाळा क्रं ३२, दक्षिणेसःगाळा क्रं ४१ उत्तरेस बाजार समितीची मोकळी जागा वरील चर्तु-सिमेच्या आतील गाळा क्रं. ३३ असे दोन गाळे कै. मुरलीधर किशनचंद मुंदडा, रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून नोंदणीकृत भाडेपट्टा लेख अन्वये भाडयाने घेतलेला असुन त्यांचा दिनांकः-०३/०५/२०२० रोजी मुत्यु झाला आहे त्यांचे वारस म्हणुन आम्ही श्रीमती मंगल मुरलीधर मुंदडा, श्री. पवन मुरलीधर मुंदडा सौ. प्रज्ञा आनंद सीखची, सौ. पल्लवी मयुर दरक सर्व वारस असुन आमच्या घरातील कौटंबीक झालेल्या सल्ला मसलत व चर्चेमध्ये असे ठरविण्यात आले आहे की वरील दोन्ही गाळे हे आमचे काका श्री. मधुसुदन किशनचंद मुंदडा यांचे नावे कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोलीच्या दप्तरी रेकॉर्डवर राहिलेल्या उर्वरीत (०१/०६/२०२९ व ०१/०९/२०३६) पर्यतच्या कालावधी करीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत श्री. मधुसुदन किशनचंद मुंदडा रा. हिंगोली यांची कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली च्या रेकॉर्डला उपरोक्त भाडेकरु म्हणून आम्ही सर्व वारसदार सहमती देत आहोत असे विनंती अर्ज केलेला आहे

सदरील रेकॉर्डवर नोंद घेण्यास कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने रेकॉर्डवर नोंद करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सचिव सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार आता सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष

### वैद्यकीय मदतीसाठी स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली, अर्जासाठीची प्रक्रिया पेपरलेस

मुंबई, दि. २४: राज्यातील गरजू रूग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात गरजूंना अत्यावश्यक आरोग्यसेवा व आर्थिक सहाय्य देण्याकरिता मंत्रालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत करण्यात आला आहे. ही सेवा नागरिकांना त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हावी अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केली होती. त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्याचा शासननिर्णय काढण्यात आला आहे.

या कक्षात सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. या निर्णयामुळे नागरिकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कामकाज अधिक सुलभ व पेपरलेस करण्यात येत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात येणार असल्याची माहिती श्री. नाईक यांनी दिली आहे. यामुळे नागरिकांचा वेळ व खर्च टाळता येणार आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून गंभीर आजारांवरील उपचारांसाठी गरजू नागरिकांना अत्यावश्यक आर्थिक मदत केली जाते. या सेवांचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेणे सहज सुलभ व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष सुरू करण्यात येणार आहे.

संबंधित जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त झालेल्या अर्जांची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे व समस्यांचे निराकरण करणे, कक्षामध्ये आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जाऊन भेट घेणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाबाबत जनजागृती आणि प्रसिध्दी करणे, जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत अर्थसहाय्य देण्याकरिता आजारांचे पुनर्विलोकन करणे व अर्थसाहाय्याची रक्कम नव्याने निर्धारित करणे याकरिता राज्यातील तज्ञ डॉक्टरांची समिती स्थापन करण्यात आली आहे. यामुळे अर्थसहाय्य देण्यात येणाऱ्या आजारांच्या संख्येत वाढ करण्यात येणार असून उपचारांचा खर्च दिवसेंदिवस वाढत असल्याने अर्थसाहाय्याच्या रकमेचा देखील समितीमार्फत आढावा घेण्यात येणार असल्याचे नाईक यांनी सांगितले.

मुख्यमंत्री कार्यालयातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा कडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना आर्थिक सहाय्य केले जाते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात. रुग्णांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करून देण्यासाठी धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष ऑनलाईन प्रणाली (चॅरिटी पोर्टल) आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष ऑनलाईन प्रणाली (सीएमआरएफ पोर्टल) एकत्रित जोडण्यात येणार आहेत. सद्याच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे.

या सुविधेमुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक गतिशील, सोपी होणार आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आतापर्यंत राज्यातील हजारो गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य मिळाल्याने अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कक्षाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधांचा गरजू रुग्णांनी अधिकाधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. नाईक यांनी केले आहे.

## जायंटस् ग्रुप ऑफ चिकलठाणाच्या अध्यक्षपदी सौ. मनोरमा मालपाणी, सचिव सौ. संगीता रुणवाल, कोषाध्यक्ष सौ. स्नेहलता रुणवाल



छत्रपती संभाजीनगर : २०२५ या वर्षासाठी जायंटस् ग्रुप ऑफ चिकलठाणाच्या अध्यक्षपदी सौ. मनोरमा मालपाणी यांची निवड झालेली आहे तसेच सचिव पदी सौ. संगीता रुणवाल, कोषाध्यक्ष पदी सौ. स्नेहलता रुणवाल, उपाध्यक्ष पदी सौ. वैशाली कासलिवाल आणि गणेश इंदानी यांची निवड तर डायरेक्टर मध्ये रतन कुंकलोळ, राजेंद्र गेलडा, राजेंद्र मालशेटवार, संतोष सेठी, डॉ. सचिन जोशी, डॉ. चित्रा बडवे, सौ. भारती गांधी, सौ. भारती पटेल, सौ. भारती कटारीया यांची निवड झाली. मार्गदर्शक म्हणून शिवप्रसाद तोतला, नरेश गुप्ता, प्रुल्ल मालानी, सीए. पुनम गिल्डा यांची एकमताने निवड झाल्याची माहिती अध्यक्षांनी पत्रकार परिषदेत दिली.

ग्रुपचा पदग्रहण समारंभ दि. २२ जानेवारी २०२५ रोजी औरंगाबाद जिमखाना क्लब येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी जगदिशजी मनीयार (मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी, छत्रपती संभाजीनगर), सन्माननीय अतिथी दिनेशजी राठी (उद्योगपती चेअरमन अँड मनेजींग डायरेक्टर आयकॉन स्टील, जालना), जायन्टस् वेलेअर फेडरेशन चे स्पेशल कमिटी मेंबर विनोदजी शेवतेकर, श्रीमती सुर्यमाला मालानी तसेच फेडरेशन २ बी चे अध्यक्ष गुरुदत्त राजपुत यांची उपस्थीती होती. इन्स्टॉलींग ऑीसर प्रशांत मालानी फेडरेशन डायरेक्टर यांनी सर्व कार्यकरीणीला शपथ दिली. तसेच जायन्टस् चे हॅमर विनोदजी शेवतेकर, श्रीमती सुर्यमाला मालानी यांनी नविन अध्यक्षांना दिले.

त्या पुढे म्हणाल्या की, यावर्षी ग्रुपर्ते प्रत्येक महिन्यात माहेश्वरी महीला मंडळ तसेच इनरव्हिल ग्रुप यांच्या संयुक्तरित्या रक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे. मुलांसाठी समता दर्शन शिक्षा मंदीर या शाळेमध्ये, वृध्दांसाठी मातोश्री वृध्दाश्रम, जीवन आधार वृध्दाश्रम येथे दंत तथा नेत्र तपासणी व चष्मा वाटपचा कार्यक्रम घेण्यात येणार आहे. आठवी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी व्यवसायिक व आर्थिक नियोजन या वरती वुडरिच हायस्कुल, नाथ व्हॅली, आ.कृ. वाघमारे, एस एफ एस स्कुल येथे सेमिनार होणार आहेत. मोदींजीच्या स्वच्छ भारत योजने अंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे विविध ठिकाणी २५ ते ३० कचरा कुंडी लावण्यात येतील. ८ मार्च महिला दिना निमित्त आरोग्य तपासणी शिबीर डॉ. खुशबु कासट (स्त्रीरोग तज्ञ) यांच्या रुणालयात घेण्यात येणार आहे.

जागतीक योग दिनानिमित्त दि. २१ जुन ते ३० जुन २०२५, दहा दिवस योग शिबीर बाळासाहेब जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येईल. १७ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर जायन्टस सप्ताहनिमित्त विविध स्पर्धा होणार आहे. यामध्ये चित्रकला स्पर्धा, वृध्दांसाठी चालण्याची स्पर्धा, विशिष्ट मुलांसाठी संगीत खुर्ची, चमचा लिंबू व धावण्याची स्पर्धा घेतल्या जातील.

ग्रुपर्ते कॅम्ब्रीज स्कुलच्या चौकामध्ये चौक सुशोभीकरण, महिला व पुरषांकरिता सार्वजनीक शौचालय शहागंज येथे स्थाई प्रकल्प (मोनोमेंटल प्रोजेक्ट) बांधण्यात येणार आहे. त्याच प्रमाणे पर्यावरणअंतर्गत वाळुज रोडवर दोन्ही बाजूने एक ते दिड किलोमिटर वृक्षारोपण व संवर्धन करण्यात येणार आहे. सामाजीक कार्यास चालना मिळावी व सर्वांनी सहभाग घ्यावा यासाठी आम्ही वेळोवेळी घेत असलेल्या प्रकल्पास पत्रकार बंधूंचे सहाकार्य लाभावे आणि आपल्या काही सूचना असल्यास त्यावर ग्रुप अवश्य साकार करेल असे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला शिवप्रसाद तोतला, विनोद शेवतेकर, प्रकाश रुणवाल, नितीन रूणवाल, सी.ए. गोपाल मालपाणी हजर होते.

## वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे होणारे अपघात व जीवितहानी टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना करा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचेकडे मागणी

नगर : शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे होणारे अपघात व जीवितहानी टाळण्यासाठी तात्काळ सर्व संबंधित विभागांची बैठक आयोजित करून प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी अभय ललवाणी यांनी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, नगर शहरात मोठ्या प्रमाणात रस्ते निर्मितीची कामे सुरू आहेत. सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय नसल्याने व कामांच्या नियोजनाअभावी गेल्या पाच महिन्यांपासून नगर शहरात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर होत चालली आहे. रस्ता निर्मिती कार्यस्थळावर कोणत्याही सुरक्षा तसेच खबरदारीच्या उपाययोजना केल्याचे दिसत नाही. याचबरोबर माळीवाडा बस स्टॅन्ड ते स्वस्तिक चौक पुणे बस स्टँड दरम्यानच्या परिसरात देखील वाहतूक कोंडीमुळे एखादा अपघात होऊन जीवितहानीची शक्यता नाकारता येत नाही.

मंगळवार दि. २१ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास तारकपूर बसस्थानक परिसरात वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका अडकली होती. उपचारासाठी रुग्णालयात पोहोचण्यास उशीर झाल्यामुळे रुग्णवाहिकेतील किशोर गोसावी नामक रुग्णाचा वेळेत उपचार न मिळाल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडलेली आहे. भविष्यात वाहतूक कोंडीमुळे अशा प्रकारच्या दुर्घटना व जीवितहानी टाळण्यासाठी सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय निर्माण व्हावा यासाठी तात्काळ बैठकीचे आयोजन करून त्यामध्ये प्रभावी उपाययोजना निश्चित करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, महापालिका आयुक्त, प्रादेशिक परिवहन अधिकारी, विभाग नियंत्रक - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना देण्यात आलेल्या आहेत.

# महाराष्ट्र जलसमृध्द करण्यासाठी अधिकाऱ्यांनी एकजुटीने काम करावे-ना.विखे

### विभागीय स्पर्धेचा पारितोषिक समारंभ संपन्न

संभाजीनगर दि.२३ प्रतिनिधी : जलसंपदा विभागामध्ये प्रचंड क्षमता आहे. हा विभाग महाराष्ट्राला जलसमृद्ध करुन शेतकऱ्याला सुखी आणि महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करु शकतो. आपण साऱ्यांनी एकजुटीने काम करावे आणि महाराष्ट्राला जलसमृद्ध करावे,असे आवाहन राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



जलसंपदा विभागाच्या गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे पारितोषिक वितरण डॉ. विखे पाटील यांच्या उपस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यगृहात संपन्न झालेल्या हा कार्यक्रमास कार्यकारी संचालक, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळ संतोष तिरमनवार,मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, मुख्य अभियंता लाभ क्षेत्र विकास जयंत गवळी, मुख्य अभियंता विजय घोगरे, अधीक्षक अभियंता इलियास चिस्ती, अधीक्षक अभियंता पल्लवी जगताप, अजय दाभाडे, भारत शिंगाडे यांची उपस्थिती होती.

डॉ. विखे पाटील म्हणाले की, या विभागाच्या कर्मचारी अधिकाऱ्यांचा ताण तणाव निवळावा यासाठी अशा क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन महत्त्वाचे आहे. ताणतणावात काम केल्याने विकासाच्या प्रक्रिया मंदावतात. त्यासाठी परस्पर संवाद वाढविणे आवश्यक आहे. हा संवाद वाढविण्यात अशा सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांचे मोठे योगदान असल्याचे विखे पाटील म्हणाले.

आपला विभाग हा थेट शेतकऱ्यांशी संबंधित असल्याने आपण शेतकऱ्यांशी संवाद वाढवावा. जलसंपदा विभाग हा शेतकरीभिमुख व्हावा, यासाठी माझे प्रयत्न आहेत. सिंचनक्षमता वाढवून आपण महाराष्ट्र दुष्काळमुक्त करुया आशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विभागाचा प्रमुख या नात्याने मी सदैव अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आहे. पाणी व्यवस्थापन, सिंचनाचे निकष, वॉटर ऑडीट या संकल्पनांवर आपण काम करण्याची गरज असून सिंचनाचे नवे तंत्र आपण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून आहे त्या पाण्याचा अधिक व प्रभावी वापर करण्याविषयी आपण शेतकऱ्यांना प्रशिक्षित केले पाहिजे,असे त्यांनी सांगितले. राज्यातील सिंचन प्रकल्पांची पूर्ण होण्याची कालमर्यादा निहाय आपण नियोजन केले पाहिजे. यासोबतच पाण्याची गळती सारख्या बाबींवर नियंत्रण मिळवले पाहिजे. आपल्या विभागाच्या क्षमतेचा पुरेपुर वापर करुन महाराष्ट्र दुष्काळमुक्त करु या,असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीप प्रज्वलन व सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांना आजच मानद डॉक्टरेट पदवी मिळाली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन व सत्कार करण्यात आला. स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले.

## महाराष्ट्र सरकार आणि विराज प्रोफाइल्स यांच्यात सामंजस्य करार

मुंबई : महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी आणि रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी, महाराष्ट्र सरकार आणि विराज प्रोफाइल्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात १२,००० कोटींच्या स्टील प्रकल्पासाठी ऐतिहासिक सामंजस्य करार झाला. हा करार डावोस येथील ५५व्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक परिषदेत मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. या करारामुळे पालघर जिल्ह्यात एकात्मिक स्टेनलेस स्टील प्रकल्पाची उभारणी होणार असून, ३,५०० रोजगार संधी निर्माण होतील आणि आदिवासी भागाचा सामाजिक व आर्थिक विकास साधला जाईल. या प्रकल्पाद्वारे विराज प्रोफाइल्स भारताच्या जागतिक स्टेनलेस स्टील क्षेत्रातील स्थान अधिक मजबूत करण्याचा आणि महाराष्ट्राच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण वाटा उचलण्याचा मानस बाळगते. सामंजस्य करारावर स्वाक्षरी करताना विराज प्रोफाइल्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. नीरज राजा कोचर आणि त्यांचे सुपुत्र श्री. ध्रुव कोचर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सरकारकडून सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले.

## मेडिकवर हॉस्पिटल येथे ऑनलाइन हिमो डायफिल्ट्रेशन सुविधा उपलब्ध

छत्रपती संभाजी नगर – कायमस्वरूपी किडनी आजार असलेल्या रुग्णांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. ह्या रुग्णांना नियमित डायलिसिस करण्याची गरज असते. ऑनलाइन हिमो डायफिल्ट्रेशन ही डायलिसिस ची एक आधुनिक उपचार पद्धत आहे ज्यामध्ये किडनी रुग्णांच्या शरीरात जमा असलेले अशुद्ध घटक जास्त प्रभावीपणे काढता येतात. ज्यांना किडनी आजारासोबत हृदयविकार आहे, शरीरात फॉस्फरस/ पोटॅशियम चे प्रमाण अधिक आहे, डायलिसिसच्या वेळी ज्यांचा रक्तदाब वारंवार कमी अधिक होतो, ज्यांचे हिमोग्लोबिन सातत्याने कमी राहते अशा रुग्णांना या उपचार पद्धतीचा विशेष फायदा होतो. ही सुविधा मेडिकवर हॉस्पिटल, छत्रपती संभाजी नगर येथे गेल्या एक वर्षापासून उपलब्ध असून आतापर्यंत शंभरहून अधिक वेळा याचा प्रभावीपणे वापर झाला आहे अशी माहिती किडनी विकार तज्ञ डॉ. सचिन सोनी यांनी दिली. या उपचार पद्धतीसाठी विशेष यंत्र, पारंगत तंत्रज्ञ आणि अतिशुद्ध पाणी (अल्ट्रा प्युअर वॉटर) याची गरज असते. या सर्व सुविधा मेडिकवर हॉस्पिटल येथे उपलब्ध असल्याने, मराठवाडा भागातील रुग्णांना प्रथमच याचा फायदा होत असल्याची माहिती केंद्रप्रमुख डॉ. दीपेन शाह यांनी दिली.

## महाराष्ट्रातील भावी अभियंत्यांसाठी एमएचटी-सीईटी कोर्सेस सादर

नांदेड : राष्ट्रीय परीक्षा तयारी सेवा क्षेत्रातील आघाडीचे नाव असलेल्या आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (एईएसएल) ने आज नांदेड, महाराष्ट्रात 'चॅम्पियन्स ऑफ आकाश' हा प्रतिष्ठित सोहळा आयोजित करून नीट आणि जेईई (मेन आणि ॲडव्हान्स्ड) २०२४ मधील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव केला. या कार्यक्रमात एईएसएलच्या एक वर्ष, दोन वर्षे आणि चार वर्षांच्या कार्यक्रमांमध्ये नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय योगदानाचे कौतुक करण्यात आले, जे भारताच्या शैक्षणिक उत्कृष्टतेला अधोरेखित करतात. समारंभाचा एक भाग म्हणून, आकाश इन्स्टिट्यूटने महाराष्ट्रातील अभियंत्यांच्या कॉलेजच्या सामाईक प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण होण्याची आकांक्षा असलेल्या इयत्ता १० आणि ११च्या विद्यार्थ्यांसाठी नवीन एमएचटी-सीईटीकोर्सेसच्या लाँचची घोषणा केली. बोर्डाच्या परीक्षेनंतर या वर्गांना सुरुवात होणार आहे. आकाश इन्स्टिट्यूटने नांदेड, महाराष्ट्रातील नीट यूजी आणि जेईई२०२४ मधील विद्यार्थ्यांच्या असामान्य कामगिरीचे कौतुक केले, ज्यामध्ये २४ नीट आणि ५ जेईई पात्र ठरलेले २९ विद्यार्थी होते. आकाशियन्सनी नीट मध्ये सर्वोच्च गुणधारकांची यादी गाजवली, प्रज्वल पालास्कर, अपर्णा रमेश्वर रेड्डी, जाधव ऋषिकेश माधवराव, पवनकुमार माणिक गाडेकर, आस्था मनीष कान्हेड, प्रतीक्षा सरजेराव पोले, रेयान सिद्दीकी, माही मस्त सागर, तटराव विनायक ठाकूर, कराळे ऋषिकेश गणेश, शैलेश संतोष पाटील, शेटे मनमाथ राजू, नितीशकुमार डोंगरे, स्वप्निल वैद्य, ऋषिकेश पोले आणि सानिका जिरवणकर यांची नेत्रदीपक कामगिरी होती. जेईई ॲडव्हान्स्डमध्ये अक्षय कदम आणि अथर्व रायपटवार यांनी आपली प्रशंसनीय क्षमता सादर केली, ज्यामुळे त्यांनी उल्लेखनीय रँक्स मिळविले.

## जगन्नाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर संपन्न



तभा वृत्तसेवा

पैठण दि २५ :- पैठण येथे आखिल भारतीय औषधी परिषदेचे जगन्नाथ आप्पा शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त पैठण तालुका औषधी विक्रेता संगटनेच्या वतीने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन यशस्वीरीत्या पार पडले.

उबाठाचे दत्ता गोर्डे , पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख कार्यक्रमाचे उद्घाटन दीपप्रज्वलन करून केले. संघटनेचे जिल्हा संगटनेचे प्रतनिधी श्री सुनील देशमुख बाळु धस, रमेश कुलकर्णी,निलेश राठी, आनंद थोरात अतुल उपाध्ये, शिवकांत नवथर, बाळू खरात, गोकुळ व्हरकटे,योगेश लोहिया, सचिन लखोटिया, अमोल उपाध्ये यांच्या सहकार्याने उत्साहात पार पडली . याकरिता शहरातील नागरिक रक्तदाते, व व्यापारी, संघटना यांनी विशेष सहकार्य केले.

# एमजीएमच्या विज्ञान प्रदर्शनात मराठवाड्यातील विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

### क्लोवर डेल शाळेच्या प्रयोगाने पटकाविले प्रथम पारितोषिक



छत्रपती संभाजीनगर, दि.२५ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या वतीने शुक्रवार, दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी विभागीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन कुलपती अंकुशराव कदम आणि कुलगुरू डॉ.विलास सपकाळ यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी, अधिष्ठाता डॉ. एच. एच. शिंदे, संचालिका डॉ. परमिंदर कौर, विभागप्रमुख प्रा. पियुष काळे, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनासाठी प्रा.सूर्यकांत शिंदे आणि प्रा.शितल भोसले यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

यावेळी बोलताना कुलपती अंकुशराव कदम म्हणाले, आज आपण विद्यार्थ्यांनी या स्कूल ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या विज्ञान प्रदर्शनात भाग घेऊन आपली विज्ञानातील आवड दाखवलेली आहे. हे महाविद्यालय आपणास दहावीनंतर अभियांत्रिकीचे शिक्षण उपलब्ध करून देणारे आहे. विद्यार्थ्यांना या परिसरात उपलब्ध करून देण्यात आलेल्या संधींचा पुरेपूर वापर करत आपला जीवन प्रवास सुखकर करावा.

आज आपण तंत्रज्ञानाच्या युगात राहत असून तंत्रज्ञान हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेले आहे. अशाप्रकारच्या विज्ञान प्रदर्शनातून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला वाव मिळत असतो. शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी तयार केलेले वैज्ञानिक प्रयोग भविष्यकाळात त्यांच्या कौशल्याला वाव देणारे ठरत असतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एमजीएम विद्यापीठ काम करत असल्याचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संचालिका डॉ.परमिंदर कौर म्हणाल्या, शाळेतील विद्यार्थ्यांना स्वत: चे प्रयोग सादर करण्यासाठी विद्यापीठ स्तरावर एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून विद्यार्थ्यांना विद्यापीठातील विविध प्रयोगशाळा पाहण्याची संधी मिळाली असून निश्चितपणे त्यांना येत्या काळामध्ये याचा फायदा होईल, असा मला विश्वास आहे.

या विज्ञान प्रदर्शनात मराठवाड्यातील ३० शाळांनी आपला सहभाग नोंदवत आपले प्रयोग सादर केले. यातील स्पर्धेत एमजीएम क्लोवर डेल स्कूल छत्रपती संभाजीनगर, प्रॉस्पेरियस पब्लिक स्कूल परभणी आणि बुन इंग्लिश स्कूल, छत्रपती संभाजीनगर या शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रयोगांना अनुक्रमे प्रथम (३०००), द्वितीय (२०००) आणि तृतीय (१०००) क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तसेच रायझिंग इंग्लिश स्तर स्कूल छत्रपती संभाजीनगर (५००) आणि ज्ञानदा इंग्लिश स्कूल, छत्रपती संभाजीनगर (५००) यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.


## राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त राजकुंवर महाविद्यालयात घेतली शपथ



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २५ राजकुंवर महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शपथ घेण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थीनी पालक शिक्षक,शिक्षिका, प्राचार्य यांच्या उपस्थितीत शपथ घेण्यात आली. यावेळी प्राचार्य ऐ.जे.बेडवाल के.एस.सिरसाठ, फिरोज तडवी, पवार, पाटील आदींच्या उपस्थितीत शपथ पार पडली.

## संत एकनाथ सचिन शुगरकडून ऊसाचा उच्चांकी भाव जाहीर



तभा वृत्तसेवा

पैठण दि २६ :- पैठण येथील श्री संत एकनाथ सहकारी साखर कारखाना सचिन घायाळ शुगर या साखर कारखान्याने गळीत हंगाम २०२४-२५ साठी गळीतास येणाऱ्या उसाच्या परिसरातील ईतर कारखान्याच्या तुलनेत उच्चांकी भाव देण्याचे जाहीर केले असून टप्याटप्याने सुरुवातीला २६०० रु तर अंतिम टप्यात २८०० प्रति मेट्रिक टन असा भाव जाहीर केला आहे.

उसाच्या दराबाबत चेअरमन सीए सचिन भैय्या घायाळ यांनी सांगितले की साखर उतारा लक्षात घेता ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी समाधानकारक भावाचे सूत्र यावर्षी आमच्या साखर कारखान्याकडून ठरवण्यात आले असून गळीत हंगाम सुरुवातीच्या काळात ऊस अपिरिपक्क असल्याने साखर उतारा कमी येतो. परंतु जसे जसे ऊसाचे वय वाढून ऊस परिपक्क होतो त्याचप्रमानात ऊस साखरेचा उतारा वाढतो. या सूत्रांच्या आधारावर गळीत हंगाम २०२४-२५ साठी येणाऱ्या ऊसाचा पंधरवडा निहाय ऊस दर गळीत हंगाम सुरू झाल्यापासून १५ जानेवारी २५ पर्यंत २६०० रु प्रती मेट्रिक टन,१६ जानेवारी ३१ जानेवारी २६५० रु,१ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २७०० रु,१६ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २७२५ रु.१ मार्च ते १५ मार्च २७५० रु. तसेच १६ मार्च ते १५ एप्रिल २०२५ पर्यंत २८०० रुपये प्रति मेट्रिक टन ऊस या प्रमाणे देण्यात येणार आहे. संत एकनाथ सचिन शुगरला ऊस देऊन शेतकऱ्यांनी या वाढीव भावाचा जास्तीस जास्त फायदा करून घ्यावा असे आवाहन चेअरमन सीए सचिन भैय्या घायाळ यांनी केले आहे.साखर उत्पादनाशिवाय श्री संत एकनाथ सहकारी साखर कारखाण्यास कुठलीही उपपदार्थ निर्मिती नसून सुद्धा एवढा उचांकी भाव जाहीर केल्याबद्दल ऊस उत्पादक शेतकरी रखमाजी मिसाळ, विजय बोबडे, दादासाहेब लिपाणे यांनी चेअरमन सीए सचिनभैय्या घायाळ यांचे अभिनंदन करून आनंद व्यक्त केला आहे. मकर संक्रांती निमित्त कारखाण्याच्या १२२२२ सभासदांना व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रत्येकी १० किलो साखर वाटप करण्यात आली असून याद्वारे आपण बांधिलकी जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचे चेअरमन सीए सचिनभैय्या घायाळ म्हणाले.

## खा. डॉ.कल्याण काळे यांचा जरंडीसह अकरा गावात शेतकऱ्यांशी संवाद




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२५ जानेवारी

जरंडी सह अकरा गावात खासदार डॉ.कल्याण काळे यांनी शुक्रवारी भेटी देत शेतकऱ्यांशी संवाद साधून अडीअडचणी समजून घेतल्या आहे.यावेळी खासदर डॉ.कल्याण काळे यांनी आगामी आठवड्यात तालुका प्रशासनाची आढावा बैठक घेऊन सर्व समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिले ही केवळ संवाद दौरा आहे या संवाद दौऱ्यात मी अडचणी समजून घेण्यासाठी आलो असल्याचे त्यांनी दौऱ्यात सांगितले. खासदार डॉ.कल्याण काळे यांनी भेटी देत ग्रामस्थाच्या समस्या जाणून घेतल्या.यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष रंगनाथ काळे,तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजू काळे,शिवसेना तालुका प्रमुख (ठाकरे गट) दिलीप मंचे,राष्ट्रवादी काँग्रेसचे(शरद पवार गट) शहराध्यक्ष रवींद्र काळे,दिनेश हजारी,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष डॉ. इंद्रजित सोळुंके,आदींची उपस्थिती होती.दरम्यान यावेळी खासदार डॉ.कल्याण काळे यांनी तिखी,बहुलखेडा,रामपूर वाडी,रामपुरा तांडा,निंबायती,निंबायती गाव,जरंडी,माळेगाव,पिंपरी, कंकराळा,या अकरा गावांना भेटी देऊन ग्रामस्थांच्या अडचणी समजून घेतल्या यावेळी जरंडीला ग्रामपंचायत, सावित्रीबाई फुले अभ्यासिका,संगीत विद्यालय आदी विविध विकास कामांची पाहणी केली.यावेळी उपसरपंच संजय पाटील,दिलीप पाटील,डॉ.अविनाश पाटील,श्रीराम पाटील,सुधीर कुलकर्णी,विजय चौधरी,कल्याण चव्हाण, निंबायती येथील राजू पाटील,राहुल गोसावी,विनोद पाटील,शमा तडवी,मौलाना फिरोज शेख,निजाम तडवी,अजीज तडवी,बाळा तडवी, तोसिफ शेख,सतीश बाविस्कर,आदींची उपस्थिती होती.

## संघ हीच जीवनगाथा



### अलकः- (२४) दोस्ती

कलकत्याला डॉक्टर होण्यासाठीच्या सहा वर्षाच्या वास्तव्यात डॉक्टरांची एका मौलवी बरोबर दोस्ती झाली होती. त्याचे नाव मौलवी लियाकत हुसेन असे होते. हा मौलवी हिंदुस्थानातील नकली राष्ट्रीय मुसलमानांच्या भांगेतील तुळस होता. हा मौलवी लोकमान्य टिळकांचा चाहता होता. स्वदेशीचा पुरस्कर्ता होता. त्याने स्वतःच्या डोक्यावरची तुर्की टोपी टाकून दिली होती व तो पांढरी टोपी घालत असे. याचे स्वदेशी वस्तूंचे 'कुबेर वस्तू भांडार' या नावाचे दुकान होते. स्वदेशीच्या प्रचारासाठी हा मौलवी येतील तितक्यांना बरोबर घेऊन प्रभात फेरी काढत असे. डॉक्टर पण आपल्या मित्रमंडळीसमवेत या प्रभातफेरीत सामील होत असत. डॉक्टरांना आवडतो म्हणून या मिरवणुकीत हा मौलवी भगवा ध्वज पण स्वतःच्या हाती घेऊन चालत असे. तो एकदा आजारी असताना दीड दोन महिने डॉक्टरांनी त्याची शुश्रुषाही केली होती.

(क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## हयात प्लेस औरंगाबाद विमानतळासह पाककृती उत्सवाचा आनंद घ्या

औरंगाबाद : अविस्मरणीय मुक्कामाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे उत्कृष्ट खाद्यपदार्थांचा आनंद घेणे, आणि हयात प्लेस औरंगाबाद एअरपोर्ट येथे प्रत्येक चवीला समाधान देणाऱ्या विविध प्रकारच्या भोजन पर्यायांचा आनंद घेता येतो. ऐतिहासिक 'गेट्सचे शहर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या ठिकाणी व्यवसाय किंवा आनंदासाठी मुक्काम करणाऱ्यांसाठी अनेक खाद्यपदार्थांचे उत्सव आणि जल्लोषपूर्ण कार्यक्रम उपलब्ध आहेत.

स्थानिक पारंपरिक चवींपासून ते जागतिक पातळीवरील आंतरराष्ट्रीय पदार्थांपर्यंत, येथे प्रत्येक पदार्थ परंपरा, नावीन्य, आणि उत्कटतेची गोष्ट सांगतो. या महिन्यात 'झिंग - वर्ल्ड ऑफ फ्लेव्हर्स', झिंग बार, आणि 'द मार्केट' या ठिकाणी असलेल्या खाद्यपदार्थांच्या खास वैशिष्ट्यांची झलक पुढीलप्रमाणे आहे:झिंग - वर्ल्ड ऑफ फ्लेव्हर्स: २६ जानेवारी रोजी भारताच्या एकतेचा उत्सव साजरा करण्यासाठी खास प्रजासत्ताक ब्रंच १६९९/-+ मध्ये उपलब्ध आहे. तसेच, संध्याकाळी प्रजासत्ताक डिनर १२९९/-+ मध्ये पेश केले जाईल. या दोन्ही वेळी विविध प्रकारचे खाद्यपदार्थ देशाच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीचा सन्मान करतील. डम्पलिंग एक्स्ट्राव्हगान्झा: २७ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत डम्पलिंग (मॉमो आणि डिमसम) यांचा खास प्रचार साजरा केला जाईल. प्रत्येक घडीत वैशिष्ट्यपूर्ण चव असलेल्या या हाताने तयार केलेल्या डिशेसचा आस्वाद घ्या. ३१ जानेवारीपर्यंत फ्लेवर्ड कॉफी आणि चॉकलेट्सचा खास आस्वाद घेऊ शकता.

## राजकुंवर महाविद्यालयात कॉपी मुक्त अभियानावर मागदर्शन करण्यात आले



तभा वृत्तसेवा

फर्दापूर दि २५ महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळामार्फत घेतल्या जाणाऱ्या इ.दहावी व बारावी परीक्षेच्या अनुषंगाने राजकुंवर महाविद्यालय येथे शिक्षक-पालक सहविचार सभा प्राचार्य डॉ.प्रा.ए.जे.बेडवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली.

यावेळी प्रा.डॉ.बेडवाल यांनी महाराष्ट्रभर राबवण्यात आलेल्या कॉपी मुक्त अभियान संदर्भात पालक व विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.प्रत्येक पालकांनी आपल्या पाल्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला पाहिजे हे केवळ शिक्षणाच्या माध्यमातून शक्य आहे असे ते म्हणाले. सहविचार सभेचे अध्यक्ष प्रा.जी. एस.पाटील यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी पालकांनी जागरूक राहून पाल्यांच्या शैक्षणिक प्रगतीकडे वारंवार लक्ष दिले पाहिजे व पालक व पाल्यांमध्ये संवाद असणे आवश्यक आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. पालक मेळावा सभेचे प्रास्ताविक सहशिक्षक शिरसाट यांनी केले व वार्षिक नियोजन आढावाही सादर केला.विचार सभेचे सूत्रसंचालन तडवी यांनी केले.यावेळी शिक्षक, पालक,विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

## सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या औषधी विक्रेत्या संघटनेचे कार्य कौतुकास्पद : खा. डॉ.कल्याण काळे



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२५ जानेवारी

संपूर्ण भारतात एकाच वेळी रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजसेवेचा एक नवीन आदर्श निर्माण केला आहे. असे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी सोयगाव येथे आयोजित रक्तदान शिबिराच्या समारोपप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात मनोगत व्यक्त केले.

अखिल भारतीय केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष जगन्नाथ काळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात ४० नागरिकांनी रक्तदान केले. शिबिराच्या समारोपप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात खासदार डॉ.कल्याण काळे व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रंगनाथ काळे उपस्थित होते.तालुका केमिस्ट अँड ड्रगिष्ट संघटनेचे अध्यक्ष संजय शहापूरकर यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

याप्रसंगी बोलताना खासदार डॉ.कल्याण काळे यांनी सांगितले की गेल्या पंचवीस वर्षापासून जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अनेक सामाजिक उपक्रम मी पाहिले आहे.तसेच सोयगाव सारख्या ग्रामीण भागात संजय शहापूरकर हे कुपोषण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत असून लवकरच सोयगाव तालुका उपोषण मुक्त होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष रंगनाथ काळे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेंद्र काळे, शिवसेना तालुका प्रमुख (ठाकरे गट) दिलीप मचे, राष्ट्रवादी काँग्रेसचे(शरद पवार गट) शहराध्यक्ष रवींद्र काळे,राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष डॉ. इंद्रजित सोळुंके, कृष्णा पाटील जुनघरे, सह मेडिकल असोसिएशनचे मंगेश सोहनी, दिनेश पंडित, विकास मंडवे, अमोल पाखरे,शोमराज चौधरी, गोपाल जाधव, शोहेब देशमुख, सईद देशमुख, मयूर राऊत,रवींद्र जाधव, गणेश जाधव,अरुण सोहनी, सचिन चोपडे, दिगंबर वाघ, विष्णू मापारी, संजय बोरसे यांच्यासह अमृता रक्तपेढीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

# पिपंळदरी परिसरात आंब्याच्या झाडाला मोहोर बहरला; यंदा गावरान आंब्याचा मिळणार गोडवा!



तभा वृत्तसेवा /उल्हास शेजवळ :

अजिंठा दि, २५ जानेवारी : सिल्लोड तालुकयातील पिपंळदरी परिसरात आंब्याच्या झाडांना आम्रमोहोर फुटल्याने यंदा गावरान आंब्याचा गोडवा चाखायला मिळणार आहे . सिल्लोड तालुक्यातील ग्रामिण भागात मोजक्याच शेतकऱ्यांकडे आंब्याची झाडे आहेत . गावरान आंबा तर दुर्मिळ झाला आहे . अनेकांनी पुर्वीची वनराई तोडून टाकले आहे .ही झाडे आकाराने मोठी असल्याने झाडांच्या सावलीत पीक येत नसल्याचे कारण पुढे करीत ही झाडे दिसेनासी झाली आहेत. काही शेतकऱ्यांनी नवीन जातीच्या आंब्याची झाडे लावली आहेत. ही झाडे आकाराने लहान व उंचीला देखील कमी असतात. बहुतांश शेतकऱ्यांनी नवीन आंब्याच्या जातीसह पुन्हा गावरान आंब्याच्या झाडाची लागवड केली आहे . मात्र काही सजक शेतकरीने गावरान आंब्याची आमराई जिवापाड जोपासत त्यातून गावरान आंब्याचे उत्पादन घेतात. उन्हाळ्यात गावरान आंब्याची मागणी होत असल्याने हमकास उत्पन्न होते.

यावर्षी गावरान आंब्याच्या झाडांना मोठ्या प्रमाणात मोहर आल्यामुळे परिसरात भरघोस आंबा येण्याचा अंदाज असल्याने ग्रामिण भागांत सर्वसामान्य ग्राहकांना आंब्याच्या गोडवा व आमरसाची चव चाखण्यास मिळेल, असे वाटत आहे.

सध्या आब्याचा मोहराचा दरवळणारा सुगंध सुखावणारा ठरत आहे.

वृक्षतोडमुळे आमराईची संख्या पूर्वीपेक्षा कमी झाली आहे.

**निसर्गाची साथ हवी.. गेल्या तीन - चार वर्षात ऐन आंब्याच्या मोहर आलेला असताना वादळी वारे व गारपिटी झाल्याने आंब्याचा मोहर गळून पडण्याचे प्रकार वाढलेले आहे. दरम्यान, हवामानामध्ये सतत बदल होत असल्याने आंब्याचा मोहर गळून काळपट झाल्याचे चित्र पहावयास मिळाले होते . या समस्यांमुळे आंब्याच्या उत्पादनात गेल्या काही वर्षांत घट झालेली दिसून येत आहे . बिकट परिस्थितीत महत्त्वाचा आधार म्हणून आंबा पिकाकडे पाहिले जाते . परंतु मोहर गळून पडल्याने आंबा उत्पादकांच्या अडचणीत वाढ झाल्याची परिस्थिती आहे .**

गावरान आंबा तर दुर्मिळ झाला आहे.

वातावरण समतोल; हंगामाला होतेय सुरुवात

तालुक्यातील विविध भागांमध्ये कमी अधिक प्रमाणात आंब्याचे उत्पादन घेतले जाते. यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक पाठबळ मिळाते. शिवाय बरेच शेतकरी आंब्याची ठोक विक्री न करता किरकोळ विक्री करतात. यात आंब्याला चांगला दर मिळत असल्याचे शेतकर्यांचे म्हणणे आहे. समिश्र हवामान परिणाम आंब्यावर झाल्याचे दिसून येत आहे.

फळाचा राजा... आंबा...

उन्हाळ्यात येणारे फळ म्हणजे आंबा. आंब्याच्या विशिष्ट चवीमुळे फळांचा राजाच म्हणतात. मंगलकार्य, सण, उत्सव, देवपूजा आणि आयुर्वेदाच्या दृष्टीने आंब्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आंब्याचे झाड सर्वसाधारणपणे ६ ते १५ मीटर उंच असते. कधी कधी २० ते ३० मीटर उंचही वाढतो. झाड डेरेदार आणि भरपूर सावली देणारे असते. आम्रावृक्षाचा उल्लेख पुराणात आणि प्राचीन साहित्यात बऱ्याच ठिकाणी आढळतो. या झाडाला प्रजापतीचे रूप मानतात.

'आंबा' असे नुसते म्हणण्यानेही मनाला तृप्त वाटते कारण आंबा एकाच वेळी पंचेद्रियांपैकी चार इंद्रियांना सुखावह असतो.

'आंबा' असे नुसते म्हणण्यानेही मनाला तृप्त वाटते कारण आंबा एकाच वेळी पंचेद्रियांपैकी चार इंद्रियांना सुखावह असतो. तेजस्वी पिवळा रंग, मोहक मधुर गंध, अवीट गोड चव आणि रसरशीत मऊ गर अशी एकाहून एक सरस वरदाने निसर्गाने आंब्याला दिली आहेत.

## अग्रलेख...

# आयुध निर्माणीतील शक्तिशाली स्फोट

नागपूरजवळ असलेल्या भंडारानजीकच्या जवाहरनगर आयुध निर्माणीत शुक्रवारी सकाळी झालेल्या शक्तिशाली स्फोटात आठ जण ठार झाले तर पाच जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. या स्फोटाची तीव्रता पाहता मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो. हा स्फोट इतका शक्तिशाली होता की, त्यात मृत्युमखी पडलेल्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे झाले आणि दूरपर्यंत ते उडून पडले होते. जवळपास १० किमी परिसरात स्फोटाचा आवाज येत होता, हादरे जाणवले होते. अनेक घरांच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या तर काही घरांना तडेही गेले. देशाचा ७६ वा प्रजासत्ताक दिन रविवारी मोठ्या उत्साहात साजरा होत असताना आयुध निर्माणीतील या स्फोटाने सगळ्यांच्या उत्साह आणि आनंदावर काही प्रमाणात विरजण पडणे स्वाभाविक आहे. या स्फोटाचे कारण तत्काळ समजू शकले नसले, तरी शॉर्टसर्किटने हा स्फोट झाला असावा, असा प्राथमिक अंदाज आहे. जवाहरनगरच्या या आयुध निर्माणीत लष्करासाठी दारूगोळा तयार केला जातो. याठिकाणी कडेकोट सुरक्षा व्यवस्था असते. बाहेरच्या लोकांना आत प्रवेश नसतो. अतिशय संवेदनशील अशा या परिसराची डोळ्यात तेल घालून काळजी घेतली जाते; तरीही अशी गंभीर घटना व्हावी, ही चिंतेची बाब म्हटली पाहिजे. कारण हा देशाच्या सुरक्षेशी संबंधित असा प्रश्न आहे. आयुध निर्माणी या संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येत असतात, त्यामुळे संरक्षण मंत्रालयाच्या पातळीवर याची दखल घेतली जाईल तसेच स्फोटामागच्या कारणांचीही चौकशी केली जाईल, यात शंका नाही. २०२५ ची सुरुवात होत नाही, तोच देशात एकामागे एक अशा चिंता वाढवणाऱ्या घटना घडत आहेत. त्यामुळे नवीन वर्षात हे काय सुरू आहे, एकामागोमाग एक अशा घटना का घडत आहेत, असा प्रश्न पडणे स्वाभाविक म्हटले पाहिजे. काही दिवसांपूर्वीच प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्याच्या एका नगरातील काही तंबूंना गॅस सिलेंडरमुळे आग लागली. सुदैवाने या आगीत प्राणहानी झाली नाही. दोन-तीन दिवसांपूर्वीच लखनौवरून मुंबईला जाणाऱ्या पुष्पक एक्स्प्रेसमध्ये आग लागल्याच्या अफवेने घाबरलेल्या प्रवाशांनी आपला जीव वाचवण्यासाठी चालत्या गाडीतून रुळावर उड्या मारल्या. तोच विरुद्ध दिशेने येणाऱ्या बंगळुरू एक्स्प्रेसखाली हे प्रवासी चिरडले गेले. यात १३ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले. जीव वाचवण्याच्या प्रयत्नात या सर्व निरपराधांना काही दोष नसताना आपले प्राण गमवावे लागले. या महिन्याच्या सुरुवातीला छत्तीसगडच्या बिजापूरजवळ नक्षलवाद्यांनी सुरुंगाचा शक्तिशाली स्फोट घडवत निमलष्करी दलाचे वाहन उडवून दिले. यात ९ जवान हुतात्मा झाले तर आणखी काही जण जखमी झाले आहेत. एकामागोमाग होत असलेल्या या सर्व घटना या निव्वळ योगायोग की आणखी काही, अशी शंका कोणाच्याही मनात येऊ शकते. या सर्व घटनांमागे एखादा समान दुवा आणि समानसूत्र तर नाही ना, अशीही शंका कोणाच्या मनात आली तर त्याला दोष कसा द्यायचा?

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील भाजपा सरकारचा तिसरा यशस्वी कार्यकाळ सुरू आहे. मोदींच्या नेतृत्वात देशाने सर्व क्षेत्रात जेवढी प्रगती केली, तेवढी आतापर्यंत काँग्रेसी सरकारच्या जवळपास ६० वर्षांच्या कार्यकाळात झाली नाही. देशातील दुसरे पोलादी पुरुष म्हणवणाऱ्या मोदींच्या नेतृत्वात जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करण्यात आले. २०२४ च्या २२ जानेवारीला अयोध्येतील राम जन्मभूमीवर उभारण्यात आलेल्या भव्य आणि दिव्य मंदिरात रामललाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. आतापर्यंत देशातील कोट्यवधी हिंदू लोकांनी जी जी स्वप्न पाहिली, त्यातील बहुतांश मोदी यांनी पूर्ण केली; प्रत्यक्षात आणली. देशवासीयांची जी स्वप्ने प्रलंबित आहे, ती पूर्ण करण्यासाठी मोदी कामाला लागले आहेत. देशात कधी नव्हते तो हिंदू माणूस ताठ मानेने चालू लागला आहे. 'गर्व से कहो हम हिंदू है' म्हणू लागला आहे. त्यामुळे देशातील एक वर्ग दुखावल्या गेल्यासारखा दिसत आहे. आतापर्यंत काँग्रेसी सरकारने आपल्या गठ्ठा मतांच्या राजकारणासाठी या वर्गाला डोक्यावर बसवले होते. या वर्गाच्या तुष्टीकरणाची मोहीम हाती घेतली होती. देशात बहुसंख्यक असलेला हिंदू समाज आपले सत्त्व आणि स्वाभिमान गमावून बसला होता. मोदींनी या वर्गाला त्यांच्या क्षात्रतेजाची जाणीव करून दिली. त्याच्यात विझत चाललेल्या आत्मविश्वासाची ज्योत पुन्हा प्रज्वलित केली. ही ज्योत नुसती प्रज्वलितच केली नाही तर ती तेजाने तळपू लागली. यामुळे अल्पसंख्यक असूनही बहुसंख्यकांना डोळे दाखवणाऱ्या या वर्गाचे डोळे पडू लागले. या वर्गाने कधीच आपल्या निष्ठा भारतमातेच्या चरणी वाहिल्या नव्हत्या. मूठ उंचावून 'भारत माता की जय' म्हणताना या वर्गाच्या तोंडातून कधीच शब्द निघत नाही; हात मात्र थरथरत असत. त्यामुळे देशात ज्या काही अतिरेकी आणि दहशतवादी घटना घडतात, त्यात सर्वात पहिले संशयाची सुई या वर्गावर वळत असते. कारण या वर्गाला या देशाची प्रगती कधीच सहन होत नाही. त्यामुळे जिथे जिथे शक्य आहे, तिथे तिथे हा पूर्ण वर्ग म्हणता येणार नसला, तरी या वर्गातील काही असंतुष्ट आत्मे आपले उपद्रमूल्य सिद्ध करीत असतात. देशाच्या सुरळीत चालत असलेल्या गाड्याला खीळ घालण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे रेल्वेतील अपघाताची गोष्ट असो की आयुध निर्माणीत झालेला शक्तिशाली असा स्फोट असो, देशवासीयांच्या मनात नको त्या शंका उद्भवत असतात. मुळात अशा शंका उद्भवण्यासाठी या वर्गाचा भूतकाळातील काळा इतिहास कारणीभूत आहे. याचा अर्थ या वर्गातील सगळेच लोक असे आहेत असे नाही. यात काही चांगले आणि या देशावर प्रेम करणारे, देशाला आपली मातृभूमी समजणारे लोकही आहेत. पण या अल्पसंख्यकात असे लोक आणखी अल्पसंख्य आहेत. त्यामुळे या उपद्रवी लोकांना आवर घालण्याची कदाचित इच्छाशक्ती असली, तरी त्यांची मानसिक आणि शारीरिक ताकद नाही, हे या लोकांचे दुर्दैव आणि त्या लोकांचे सुदैव म्हटले पाहिजे. त्यामुळे भंडाऱ्याजवळच्या आयुध निर्माणीत झालेला शक्तिशाली स्फोट अशा देशविरोधी शक्तींनी घडवून आणला असेल तर तो सर्वांची झोप उडवणारा विषय ठरू शकतो. याबाबत आताच कोणती प्रतिक्रिया व्यक्त करणे घाईगर्दीचे ठरू शकते. मात्र, असे होणे पूर्णपणे अशक्य आहे, असेही नाही.

भंडारा आयुध निर्माणीतील या स्फोटात झालेली प्राणहानी तसेच वित्तहानी हा अतिशय चिंतेचा विषय म्हटला पाहिजे; त्याहीपेक्षा महत्त्वाचा मुद्दा या स्फोटात लष्करासाठी तयार केला जाणारा दारूगोळा पूर्णपणे नष्ट झाल्यामुळे लष्करासमोर नवीन संकट उभे राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. आयुध निर्माणीतील हा स्फोट एक अपघात असला, तरी त्याची तीव्रता आणि गांभीर्य कमी होत नाही आणि यामागे घातपात असेल तर त्याचे गांभीर्य आणखी वाढल्याशिवाय राहात नाही. त्यामुळे याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. मात्र, पहिल्या दिवसाची प्राथमिकता ही मदत आणि बचाव कार्यांची असते. स्फोटात जे जखमी झाले, त्यांना तातडीने चांगले उपचार मिळाले पाहिजे. स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना नियमाप्रमाणे नुकसान भरपाई मिळेलच. मात्र अशा आर्थिक मदतीने कोणाच्याही घरातील गेलेला माणूस परत येऊ शकत नाही. घरातील कर्ता पुरुष गमावल्यामुळे त्या घराचे जे नुकसान होते, ते कधीच भरून न निघणारे असते. आर्थिक मदतीने भविष्यकाळातील दैनंदिन गरजा सुटत असल्या, तरी ज्या महिलांनी आपला पती, ज्या मुला-मुलींनी आपले वडील गमावले असतात, त्याची भरपाई कोणीच करू शकत नाही. त्यामुळे या स्फोटामागच्या कारणांचा अभ्यास करून अशा घटना भविष्यात होणार नाही, याची काळजी घेणे हाच यावरचा सर्वोत्तम उपाय आहे.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# महाकुंभ आणि रिकामे कुंभ

भारत देशाला समजून घ्यायचे असेल तर भारतीय दृष्टिकोनातूनच समजून घेता येईल. भारत आज कितीही आधुनिक झाला असला, तरी पाश्चात्त्य दृष्टिकोनातून या देशाकडे पाहता येत नाही. रिलिजनच्या दृष्टिकोनातून धर्म समजून घेता येणार नाही. कारण भारताचे आधुनिकीकरण हे वरवरचे आहे. म्हणजेच भारताचे शरीर मॉडर्न असले, तरी भारताचा आत्मा आध्यात्मिक आहे. महान तत्त्वज्ञानी ओशो यांनी खूप सुंदर कथा सांगितली आहे. जपानमध्ये एक संत कवी होते आणि एक आधुनिक तरुण कवी राहत होता. त्या तरुण कवीला नेहमी असं वाटायचं की, आपल्याकडे कितीही पैसे आणि प्रसिद्धी आली तरी संत कवींची प्रसिद्धी आपल्यापेक्षा जास्त आहे. त्याला प्रश्न पडायचा की, त्यांच्या कवितांमध्ये असं काय आहे जे माझ्या कवितेत नाही. या प्रश्नाचं उत्तर मिळविण्यासाठी तो संत कवींच्या आश्रमात गेला. संत कवीने त्याचे चांगले स्वागत केले, पाहुणचार केला. पण तरुण कवी त्यांना एकच प्रश्न विचारत होता,

''तुमच्या कवितेत असं काय आहे जे माझ्या कवितेत नाही. तुम्ही इतके प्रसिद्ध का? तुम्ही तर पब्लिसिटीसुद्धा करीत नाही. मी मात्र माझ्या कामाची पब्लिसिटी करतो, जाहिरात करतो. तरीदेखील लोक तुम्हाला जास्त मानतात.'' संत कवी त्याचं बोलणं शांतपणे ऐकत होते. ते म्हणाले की,

''आपण या विषयावर नंतर बोलू. आधी भोजन उरकून घेऊ.'' भोजन झालं, पण संत कवी काहीच बोलेना. त्यानंतर ते बाहेर फेरफटका मारायला गेले. फिरतानाही संत कवी मूळ विषयावर चर्चा न करता,

''हा निसर्ग किती सुंदर आहे नै, किती छान वारा सुटलाय, चंद्राच्या प्रकाशात चालण्याचा आनंदच काही निराळा असतो...'' अशी अवांतर चर्चा करीत होते. मात्र, तरुण कवीला ही बडबड ऐकायची नव्हती. तो वैतागून म्हणाला,

''हे पाहा महाराज, मी तुमचा आदर करतो. पण तुम्ही माझ्या प्रश्नाचं उत्तर न देता नको ती बडबड करत आहात. तुम्हाला जर उत्तर नसेल द्यायचं तर सांगा. मी निघून जातो.'' त्यावर संत कवी स्मितहास्य करीत म्हणाले,

''बघ, तलावसुद्धा किती सुंदर आहे. चंद्राचं प्रतिबिंब या तलावात किती अप्रतिम दिसतंय. एक काम कर, हा दगड उचल आणि या प्रतिबिंबाच्या दिशेने भिरकावून दे.'' त्यावर तरुण कवी त्यांच्याकडे विचित्र नजरेने पाहू लागला. पण ते म्हणाले,

''मी तुझ्या प्रश्नाचंच उत्तर देतोय.'' मग त्याने दगड घेतला आणि पाण्यात चंद्राच्या प्रतिबिंबावर फेकला. तसा तो पाण्यातला चंद्र अस्थिर झाला. तरंग उठल्यामुळे चंद्राचं प्रतिबिंब काही वेळ थरथरलं. मग संत म्हणाले,

''आता दुसरा दगड घे आणि आकाशातल्या चंद्राच्या दिशेने भिरकावून दे.'' तरुण म्हणाला की,

''हे कसं शक्य आहे? हा दगड तिथपर्यंत पोहोचणारंच नाही.'' संत कवी म्हणाले,

''हाच फरक आहे, तुझ्या कवितांमध्ये आणि माझ्या कवितांमध्ये. तुझ्या कविता म्हणजे पाण्यातला चंद्र आणि माझ्या कविता म्हणजे आभाळातला चंद्र... कुणी कितीही ठरवलं तरी चंद्राचं अस्तित्व पुसून टाकू शकत नाही आणि चंद्राला जाहिरातीची गरज नाही. चंद्र इतका दिव्य आहे की कोणतीही जाहिरात न करता त्याचं अस्तित्व सर्वांना जाणवतं, त्याचं आकर्षण सर्वांना वाटतं.''

वाचकहो, सध्या कुंभमेळ्यातही हेच घडत आहे. मुख्य मीडिया आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर साध्वींच्या वेशात फिरणाऱ्या तरुणींचं सौंदर्य दाखवत आहेत, मोनालिसाच्या सुंदर डोळ्यांची चर्चा होत आहे. आयआयटी बाबा प्रसिद्ध झाले आहेत. लक्षात ठेवा, भारत हा असा देश आहे जिथे स्त्रीच्या सौंदर्याची व्यवस्थित चर्चा केली गेली आहे; त्याचबरोबर स्त्रीच्या शक्तितत्त्वाची उपासनाही इथे होत आहे. आजच्या युगात काही लोक इतके स्वैर वागू लागले आहेत की, यांना कशाचंही बंधन राहिलेलं नाही. देवळात गेल्यावर उपासना करायची असते आणि शयन कक्षात शृंगार हा भेद जर कुणाला कळत नसेल तर त्याची सद्सद्विवेक बुद्धी मृतावस्थेत गेलेली आहे, असेच मानावे लागेल. कुंभमेळा हे पवित्र आध्यात्मिक स्थळ आहे. मग इथलं पावित्र्य, इथली आध्यात्मिक महिमा जगाला दाखवायची की नुकतीच वयात आलेल्या जपमाळ विकून पोट भरणाऱ्या मुलीचे सुंदर डोळे दाखवायचे? साधू-साध्वींचं सौंदर्य महत्त्वाचं नसतं तर त्यांची ईश्वराप्रती असलेली समर्पण वृत्ती महत्त्वाची असते आणि एखाद्या शिष्येला साध्वी म्हणणं कितपत योग्य आहे? याचं भान या लोकांनी नको का ठेवायला? महाकुंभ हे अद्भुत आहे. या ४५ दिवसांत ४० कोटी लोक इथे पवित्र स्नान करायला येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. म्हणजे दिवसाला सुमारे ९० लाख भाविक ईश्वराच्या तत्त्वात लीन होणार आहेत. ही किती अनोखी आणि अद्भुत गोष्ट आहे. जगात कुणालाही आमंत्रण न देता फक्त ४५ दिवसांच्या कालावधीत इतके लोक शिस्तबद्ध पद्धतीने एकत्र येऊ शकतात का? आणि इतकं सुंदर आयोजन कुठे पाहायला मिळतं का? सुमारे दोन लाख कोटींचा खर्च या सर्व भाविकांकडून होणार आहे. म्हणजे महाकुंभ केवळ आध्यात्मिक पर्व नसून आर्थिक पर्वदेखील आहे. कितीतरी लोकांना यामुळे रोजगार मिळत आहे. ही आहे हिंदू धर्माची ताकद. मग या गोष्टी न दाखवता स्त्रियांच्या सौंदर्याच्या मागे का पडले आहेत हे इन्फ्लुएंसर?

वरील गोष्टीत सांगितल्याप्रमाणे, हे इन्फ्लुएंसर चंद्राच्या प्रतिबिंबाकडे पाहून आनंद व्यक्त करीत आहेत. पण परम सुंदर चंद्राकडे पाहायला कुणाचीच तयारी नाही. साध्वी आणि तिथे फिरणाऱ्या मुलींचं सौंदर्य पाहण्यापेक्षा मूलतत्त्व असलेल्या शिवाची सुंदरता अनुभवायला हवी. कारण शिव सत्य आणि सुंदरही आहे. त्याच्या त्या अद्भुत सुंदरतेची तुलना कशाशीच करता येत नाही. ही सुंदरता अनुभवण्यासाठी इन्फ्लुएंसरची नव्हे तर इंट्युशनची आवश्यकता आहे. अर्थात अध्यात्मातला हा खूप मोठा टप्पा आहे. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी खूप साधना करावी लागेल. पण सुरुवात तर करायला हवी ना... त्यामुळेच सर्वांनी सद्सद्विवेकबुद्धीचा वापर करून महाकुंभाचं पावित्र्य राखलं पाहिजे. खरं तर या आभाळातल्या चंद्राला जाहिरातीची आवश्यकता नाही. महाकुंभाचे महत्त्व आज जगाला कळले आहे. भारत हा देश जगाचे आध्यात्मिक आणि सांस्कृतिक नेतृत्व करू शकतो, यावर शिक्कामोर्तब झालेला आहे; पण कुंभमेळ्यात येणाऱ्या 'रिकामे कुंभ' असलेल्या इन्फ्लुएंसर्सना आवरायला हवं...

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# दावोस करारावर महाराष्ट्राची छाप!

दावोस येथे आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या भारताच्या पॅव्हेलियनमध्ये महाराष्ट्राचीच छाप दिसून आली. यामध्ये जगातील विविध उद्योग क्षेत्रातील दिग्गज समजल्या जाणाऱ्या कंपन्यांशी १५ लाख ७५ हजार कोटी रुपये एवढ्या विक्रमी गुंतवणुकीचे सामंजस्य करार करता आले. या माध्यमातून महाराष्ट्रात १५ लाख ९८ हजार रोजगार निर्मिती होण्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

वास्तविक यावेळी भारतातील तामिळनाडू, आंध्रप्रदेश इत्यादी राज्याचे प्रतिनिधीदेखील दावोस वर्ल्ड फोरममध्ये गेले होते. त्यावरून एका वृत्तवाहिनीच्या मुलाखतीत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, यावेळी भारताच्या सर्वच राज्यांमध्ये प्रचंड चुरस आहे. ती स्पर्धात्मक आणि सहकार्यात्मक असल्याचे त्यांनी सांगितले. कारण भारताला ५ ट्रिलियन इकॉनॉमी व्हायचे आहे किंवा आम्ही जगातली तिसरी अर्थव्यवस्था होण्याकडे वाटचाल करीत आहेत, त्यासाठी सर्वांनाच विकास साधावा लागेल. त्यासाठी देशातील सर्वच राज्यांना विकास करावा लागणार आहे. तसेच, याबाबत झालेल्या पत्रकार परिषदेत भारतातील या राज्यांचे व विविध पक्षांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. जवळपास विविध ७ ते ८ पक्ष, विविध भाषिक असूनही त्या सर्वांचा एकच मुख्य अजेंडा होता, तो म्हणजे राष्ट्र प्रथम! याचे दर्शन या फोरमच्या निमित्ताने पाहायला मिळाले. यामध्ये विविध भारतीय कंपन्यांचे स्टॉल लावण्यात आले होते. त्यात विशेषतः माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील स्टॉल विशेष आकर्षणाचे केंद्र होते. दावोस येथून मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी दृकश्राव्य प्रणालीने संवाद साधला. राज्याचे उद्योगमंत्री यात मुंबईतून सहभागी झाले होते. जल सुरक्षित भविष्यासाठी जागतिक सहकार्य हा विषय मुख्यमंत्र्यांनी मांडला. राज्यात त्यांच्या संकल्पनेतून अंमलात आलेल्या जलयुक्तशिवाय योजनेचे सादरीकरण त्यांनी केले.



या कराराच्या माध्यमातून एमएमआयमध्ये ६ लाख कोटींची गुंतवणूक राज्यात येत आहे. विदर्भालाही त्याचा मोठा फायदा होणार आहे. विदर्भात ५ लाख कोटी, उत्तर महाराष्ट्र ३० हजार कोटी आणि मराठवाडा हे मॅन्युफॅक्चरिंग हब म्हणून भविष्यातील शक्तिस्थळ ठरत आहे. मला आठवते की, यापूर्वी मुख्यमंत्र्यांना वृत्तवाहिनीच्या एका प्रतिनिधीने उद्धव ठाकरे यांनी राज्यातील उद्योग गुजरातमध्ये पळविल्याचा आरोप केल्याचा प्रश्न विचारला होता. त्याच्या उत्तरात मुख्यमंत्री म्हणाले होते की, महाराष्ट्रातील उद्योग कोणीही पळविलेले नाही. तर, आता मुंबई, पुणे सोडून उद्योजक संभाजीनगर व जालना जिल्ह्याकडे लक्ष केंद्रित करीत आहेत. त्यामुळे हे जिल्हे भविष्यातील नवीन मॅन्युफॅक्चरिंग हब होऊ शकतात. तसेच, महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) व माहिती तंत्रज्ञानात अग्रेसर राहण्यासाठी या वर्ल्ड फोरममध्ये करार करण्यात आले. त्यात गुगलशी झालेल्या कराराचा समावेश आहे. नवी मुंबईत इनोव्हेशन सिटी निर्माण करून एक परिसंस्था अभारण्याची मुख्यमंत्र्यांची योजना आहे. यशस्वी दावोस करारामुळे महाराष्ट्रात विदेशी गुंतवणूक होऊन मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे विरोधकांकडून महाराष्ट्रातील उद्योग गुजरातने पळविल्याच्या आरोपाला खणखणीत उत्तर मिळणार आहे. महाराष्ट्राने महायुतीला दिलेल्या प्रचंड बहुमताचे फायदे आता जनतेला नजीकच्या काळात मिळणार आहेत. राज्यात प्रचंड बहुमताचे स्थिर सरकार असल्यामुळे राज्याच्या हित व विकास साधण्याचे काम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुतीचे सरकार करणार असल्याची खात्री दावोस करारावरून मिळत आहे. ही तर सुरुवात आहे. पुढील पाच वर्षांत महाराष्ट्राचा औद्योगिक विकास झपाट्याने होईल, यात शंका नाही!

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# गडचिरोली आता थांबणार नाही!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्र्यांचा आझाद मैदानावर शपथविधी झाला तेव्हा तेथे 'महाराष्ट्र आता थांबणार नाही...' अशी टॅग लाईन या शपथविधी सोहळ्याला देण्यात आली होती. २०१४ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विकासाचा धडाका लावला होता. मात्र, त्यानंतर गद्दारी करून उद्धव ठाकरेंनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत हातमिळवणी केली, मुख्यमंत्रिपदावर बसले. त्यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकारच्या काळात सर्व प्रकल्प आणि योजनांना केवळ स्थगिती देण्याचं काम अडीच वर्षांपेक्षा जास्त काळ झाले. मोठमोठे प्रकल्प थांबविल्यामुळे प्रकल्पांच्या किमतीत वाढ झाली आणि राज्याचे अर्थात जनतेच्या पैशाचे कोट्यवधींचे नुकसान झाले. त्यामुळे कदाचित थांबलेला महाराष्ट्र आता थांबणार नाही, असे ब्रीद आपल्या सरकारचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यावेळी ठरविलेले दिसते. त्यांच्या या निश्चयाची सुरुवात ही गडचिरोलीपासून होताना झाल्याचे बघायला मिळत आहे. गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्राचा शेवटचा जिल्हा नसून पहिला जिल्हा आहे. त्याचा विकास आता थांबणार नाही, गडचिरोली आता थांबणार नाही! असा संदेश मुख्यमंत्र्यांनी आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून दिला आहे.

गडचिरोली महाराष्ट्राचा शेवटचा नाही, तर पहिला जिल्हा आहे. महाराष्ट्राची सुरुवात इथून होते. म्हणूनच एकीकडे विकासाचा प्रवाह आणणं, तर दुसरीकडे शांतता प्रस्थापित करणं या दोन्ही मार्गांवर आम्ही यशस्वी वाटचाल करणार आहोत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं होतं. देशभरात सर्वत्र नवीन वर्षाचा जल्लोष सुरू असताना मुख्यमंत्री फडणवीस मात्र गडचिरोली दौऱ्यावर होते. नवीन वर्षाची सुरुवात त्यांनी गडचिरोलीच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवून केली. कोनसरी इथं विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन झालं. गडचिरोलीत विकासाची गंगा आणेल, असा शब्द फडणवीसांनी दिला होता. शब्दाला खरे उतरत फडणवीसांनी 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'सारख्या जागतिक व्यासपीठावरून दाखवून दिले.

गडचिरोली इथं मोठं परिवर्तन होत आहे आणि होईल, याचा ट्रेलर



दावोस येथून मुख्यमंत्र्यांनी दाखविला आहे. दावोसला जाण्याआधी मुख्यमंत्र्यांनी किमान सात लाख कोटींची गुंतवणूक आपण महाराष्ट्रासाठी आणणार, असा विश्वास व्यक्त केला होता. मात्र, आत्मविश्वासाच्या बळावर दुप्पटहून अधिक, अर्थात रेकॉर्ड ब्रेक १५ लाख ७० हजार कोटींची गुंतवणूक राज्यात आणण्यात मुख्यमंत्री फडणवीस यशस्वी झाले आहेत. ७७ वर्षांच्या इतिहासातला हा सर्वाधिक आकडा आहे. त्यातल्या त्यात मुख्यमंत्र्यांनी ३ लाख कोटींहून अधिकची गुंतवणूक एकट्या गडचिरोली जिल्ह्यात आणली ती देखील पहिल्या क्रमांकावर करार करून, हे यावेळी विशेष आहे. बरं, हे करताना गडचिरोलीचा वसाहतीसारखा वापर होणार नाही तर खाणकामाचे फायदे स्थानिकांनाच मिळतील, हे देखील मुख्यमंत्र्यांनी सुनिश्चित केलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी गडचिरोली जिल्ह्यातील वढलापेठ येथे 'सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड' कंपनीच्या ग्रीन फिल्ड इंटिग्रेटेड स्टील प्रकल्पाचे उपमुख्यमंत्री असताना आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर भूमिपूजन केले होते. ज्या ठिकाणी हा कार्यक्रम पार पडला, याच भागात ४० वर्षांपूर्वी १९८४ साली माओवाद्यांचे सर्वात मोठे अधिवेशन झाले होते. प्रदीर्घ काळ नलक्षवादाने ग्रस्त राहिलेला हा जिल्हा विकासामध्ये मागे पडत राहिला आहे. नक्षलवादाचा बीमोड करण्यात अनेक वर्षे सरकारच्या हाती अपयशच आले. नक्षल्यांच्या प्रभावामुळे या भागात उद्योग यायला तयार नव्हते. रस्ते, पूल बांधायला पुढे येणाऱ्या कंत्राटदारांची वाहनं जाळून टाकणे, कामात अडथळा निर्माण करण्यासारख्या घटनांमुळे येथे कनेक्टिव्हिटीचीदेखील वाणवाच आहे. नक्षल्यांची भीती, दळणवळणाची अडचण, मोबाईल टॉवर जाळून टाकल्यामुळे संपर्क यंत्रणा नसणे यासारखी अनेक कारणं गडचिरोलीच्या विकासाला खीळ बसविणारी ठरली आहेत.

मात्र, २०१४ पासून फडणवीसांनी सुरू केलेली गडचिरोलीची विकासाच्या दिशेने झालेली वाटचाल ऐतिहासिक असून येत्या काळात ३ लाख कोटींहून अधिकची गुंतवणूक एकट्या गडचिरोलीत होणार आहे. त्यापूर्वी सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड सुमारे १० हजार कोटींची गुंतवणूक करत आहे. प्रकल्पाच्या माध्यमातून ७ हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार असून येत्या काळात या प्रकल्पाची 'तयार स्टील' उत्पादनाची क्षमता ८ दशलक्ष टन इतकी होणार आहे. यापूर्वी लॉईड्सने केलेल्या गुंतवणुकीतून ४ दशलक्ष टन इतकी क्षमता उभी राहिली होती. या दोन्ही प्रकल्पांमुळे महाराष्ट्राच्या एकूण फिनिश्ड स्टील उत्पादनात ३० टक्के वाटा हा एकट्या गडचिरोलीचा असणार आहे. चामोर्शीत वेगळ्याने ३५ हजार कोटींची गुंतवणूक होणार असून त्या माध्यमातून २० हजार तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी गडचिरोलीचे पालकमंत्रिपद आवर्जून स्वतःकडे ठेवून घेतल्याने आता गडचिरोली थांबणार नाही, हे काळ्या दगडावरची रेष म्हणायला हरकत नाही.

**औकात अपनी अपनी...**

यापूर्वी महाविकास आघाडीकडून आदित्य ठाकरेंनी दावोसमध्ये जाऊन ३० हजार कोटींचे सामंजस्य करार केले होते. त्यातदेखील महाराष्ट्रात झालेलेच करार पुन्हा दुसऱ्यांदा दावोसला जाऊन केल्याचे समोर आले होते. त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर त्यांनी ३ लाख १० हजार कोटींच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार केले होते. आता फडणवीसांनी तर इतिहासच रचला आहे. त्यामुळे कोण किती गुंतवणूक महाराष्ट्रासाठी आणली आणि कोणाची कुवत किती, हे या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

९२७०३३३८८६

### भक्ती, शक्ती आणि व्यवस्थापनाचा सुंदर मिलाफ म्हणजे कुंभमेळा!

हिंदू धर्मातील सर्वात पवित्र आणि प्राचीन परंपरा म्हणजे कुंभमेळा! भक्ती, शक्ती आणि व्यवस्थापनाचा सुंदर मिलाफ अशी कुंभमेळ्याची जगभर ओळख आहे. कुंभमेळा हे साधू-संत आणि पवित्र व्यक्तींच्या भेटीचे ठिकाण आहे. विशेष म्हणजे भेटीचा हा योग १२ वर्षांतून एकदा कुंभमेळ्यातच येतो. या मेळ्यातील साधूंचे आखाडे हे विशेष आकर्षण ठरतात. या ठिकाणी सामान्य लोक या साधू-संतांना भेटू शकतात. कुंभपर्व सामान्य लोकांसाठी पुण्य प्राप्तीची संधी आहे. मकर संक्रांती, वसंत पंचमी यासारखे काही दिवस स्नानासाठी विशेष शुभ मानले जातात. या दिवशी स्नानासाठी भारतवर्षातून लोक कुंभमेळ्यात हजेरी लावतात. हिंदूंचा हा धार्मिक उत्सव असला, तरी जगाच्या कानाकोपऱ्यातून पर्यटक भाविक स्नानासाठी येतात. यावर्षी अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटलीसह अनेक देशातून लोक शाहीस्नानासाठी कुंभमेळ्यात आले आहेत. श्रद्धा, व्यापार आणि आधुनिक व्यवस्थापनाचा हा संगम भारताच्या आर्थिक आणि सांस्कृतिक महत्त्वाला अधोरेखित करतो.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५



## वाचक पत्रे

### वाढीव ईपीएफ पेन्शन केव्हा मिळणार?

ईपीएफ पेन्शनधारकांना सध्या दरमहा १ हजार ते ३ हजार पेन्शन मिळत आहे. राज्यात ७० लाखांहून अधिक पेन्शनर आहेत. महागाईच्या तडाख्यात जीवन जगणे अशक्य झाले आहे. नुसत्या चर्चा सुरू आहे इतकी पेन्शन वाढली, वाढणार आहे. प्रत्यक्षात मात्र काही नाही. वाढीव पेन्शन मिळण्याच्या आशेने अनेकांनी श्वास सोडले. आता मात्र सरकारने फार अंत न पाहता या प्रश्नाकडे लक्ष घालावे ही विनंती. नवीन सरकार घेणारे नाही तर देणारे आहे अशी सरकारची प्रतिमा आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहावे, ही पुनश्च विनंती.

**विजय देशपांडे**/९०९६६५९४७०

### दानाचे महत्त्व!

कुंभमेळा हिंदू धर्मातील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक एकात्मतेचे प्रतीक असून जगातील सर्वात मोठ्या धार्मिक मेळाव्यांपैकी एक मानला जातो. करोडो साधू, संत, विद्वान आणि श्रद्धाळू स्नान, साधना, दानधर्म आणि सत्संगासाठी येथे एकत्र येतात. पद्म पुराणानुसार प्रयागराज सर्व तीर्थांमध्ये श्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. प्रयागराजच्या केवळ दर्शनाने पापक्षय होतो. महाप्रलयातही प्रयागराज शाश्वत राहील, अशी मान्यता आहे. कुंभ स्थानी केलेल्या स्नान आणि तर्पणाने पूर्वजांना मुक्ती मिळते. विविध पीठांचे संत, विद्वान आणि शंकराचार्यांचा सत्संग कुंभमेळ्यामुळे लाभतो. अशा या कुंभमेळ्यात विविध सामाजिक, आध्यात्मिक संस्था सेवाकार्य आणि धर्मजागृतीचे कार्य करत असतात. सगळ्यांना आर्थिक स्वरूपात अर्पण देऊन आपणही या धर्म जागृतीच्या कार्यात अप्रत्यक्ष सहभागी होऊ शकतो. पुराणानुसार तीर्थक्षेत्री, विशिष्ट काळात केलेल्या दानाचे १००० पट अधिक महत्त्व आहे.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

### राजयोगी स्नान नव्हे तर आध्यात्मिक स्नान!

देशातीलच नाही तर जगातील सगळ्यात मोठे असणारे हिंदूंचे धार्मिक एकत्रीकरण म्हणजे कुंभमेळा. प्रयागराज येथे सुरू असलेला कुंभमेळा सगळ्याच दृष्टीने विशेष असा आहे. हा कुंभमेळा तब्बल १४४ वर्षांनी आलेला आहे, म्हणूनच त्याला महाकुंभ संबोधण्यात आले. गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या सुंदर त्रिवेणी संगमावर प्रयागराज येथे या महाकुंभमेळ्याला सुरुवात झाली आहे. विविध आखाड्यांचे साधुसंत त्यांच्या शिष्यासह पवित्र स्नानासाठी दाखल झाले आहेत. त्याचबरोबर करोडोंच्या संख्येत देशातूनच नव्हे तर परदेशातूनदेखील भाविक पवित्र स्नानासाठी येत आहेत. पुण्यफलदायी, पापनाशक आणि मोक्षप्राप्ती करून देणारे त्रिवेणी संगमावरील हे अद्भुत जल आणखीनच पवित्र होते, जेव्हा विविध आखाड्यांचे साधुसंत यात स्नान करतात. महर्षी आध्यात्मिकविश्व विद्यालयाच्या वतीने नुकतीच एक चाचणी करण्यात आली; ज्यामध्ये संतांचे राजयोगी स्नान झाल्यानंतर पाण्याच्या आध्यात्मिक पातळीवर त्याचा काय परिणाम होतो, हे तपासण्यात आले. त्यासाठी युएएस (युनिवर्सल ऑरा स्कॅनर) या उपकरणाचा  करण्यात आला. या उपकरणाने वस्तू, वास्तू आणि व्यक्ती यांमधील सकारात्मक आणि नकारात्मक ऊर्जा मोजता येतात. मुळातच कुठल्याही सात्त्विक नद्यांच्या संगमावरील पाणी तसेच आजूबाजूचे वातावरण हे सकारात्मक उर्जेने परिपूर्ण असते आणि साधुसंतांनी स्नान केल्यामुळे त्यांच्याकडून प्रक्षेपित होणाऱ्या चैतन्यदायी उर्जेमुळे तेथील पाण्यात सकारात्मक उर्जेची वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. यावरून राजयोगी स्नानाचे आध्यात्मिक महत्त्व लक्षात येते.

**डॉ. स्वाती देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उदगीर येथील विद्यार्थ्यांचे परिक्षेत यश

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२६ जानेवारी -**

सातव्या राष्ट्रीय पातळीवरील घेण्यात आलेल्या उदगीर येथील मेट्रे ब्रेन ऑबॉकस अकॉडमी च्या विद्यथ्यांनी सहभाग नोंदवुन झालेल्या परिक्षेत यश संपादन केले आहे.

या मध्ये सार्थक कैलास बिबराळे या विद्यार्थ्याने ग्रॉण्ट टॉपर

पारितोषक पटकावले असुन आन्वी सागर वट्टमवार, चैतन्य गजानन यरमवार, अंजली जयप्रकाश पाटील, पार्थ किशोर डेबडवार, स्वप्निल कैलास बिबराळे, केतक व्यंकटेश पेन्सलवार, देवांश अनुप पेन्सलवार, समुद्धी योगेश

गव्हाणे, राज अनिल जवादवार, अक्षरा बिबराळे, एकदंत चिद्रेवार, अन्वी आकाश हजारे, आर्जुन जवादवार या विद्यार्थ्यांनी यशस्वी रित्या परिक्षेत यश मिळवले आहे.

या यशाबदल विद्यार्थ्यांचे सर्वत्र कैतुक करण्यात येत आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### 'महाराष्ट्र'मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न


**निलंगा, दि.२५ जानेवारी -**

महाराष्ट्र विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक मोहन नटवे, तर प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, पोलिस निरीक्षक सुधीर सुर्यवंशी, प्राचार्य डॉ. भागवत पौळ, डॉ.एस. एस. पाटील, उपमुख्याध्यापक डी.डी. पवार, पर्यवेक्षिका एस.डी. देशमुख आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते. प्रास्ताविक शरद सोळंके यांनी केले. सुत्रसंचलन अमरदीप पाटील यांनी तर आभार सांस्कृतिक प्रमुख संतोष कांबळे यांनी मानले. स्नेहसंमेलनामध्ये विविध कलाप्रकार, नाटिका, गीतगायन, भारूड, एकांकिका, लावणीनृत्य, कोळीगीते, चित्रपट गीते, शैक्षणिक प्रबोधनपर कार्यक्रम, मनोरंजनात्मक कार्यक्रम इत्यादी विविध गुणदर्शन सादर करण्यात आले. सांस्कृतिक विभागातील एस.आर. मुगळे, एस.ए. जन्मले, यु.व्ही. पांचाळ, एस.यु. देशमुख यांनी विद्यार्थ्यांची संपूर्ण तयारी करून घेतली. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

### कै. गस्तगार 'ज्ञानरत्न पुरस्कार' घोषित

**निलंगा, दि.२५ जानेवारी -**

तालुक्यातील औराद (शहा) येथील शारदोपासक शिक्षण संस्था संचलित शारदा तंत्रनिकेतन महाविद्यालयातील




तीन गुणवंत विद्यार्थिनींना कै. वत्सलाबाई गस्तगार 'ज्ञानरत्न पुरस्कार'ने सन्मानित करण्यात येणार आहे. कै. वत्सलाबाई काशिनाथ गस्तगार यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार, ग्रामीण भागातून शिकत असलेल्या, शेतकऱ्यांच्या होतकरू गुणवंत मुलींना गेल्या बारा वर्षापासून अखंडपणे दिला जातो. यावर्षी हा पुरस्कार नंदिनी जगन्नाथ पवार प्रथम वर्ष (प्रथमश्रेणी), कीर्ती महादेव कलगाने द्वितीय वर्ष (प्रथमश्रेणी), सुजाता तानाजी सावरे तृतीय वर्ष (प्रथमश्रेणी) यांना हा पुरस्कार घोषित झाला आहे. २०१४ मध्ये हा पुरस्कार पटकावणारी शुभांगी रमेश बिरादार शेळगी ही मुलगी यातून प्रेरणा घेऊन भारतीय विद्यापीठांमध्ये सर्वप्रथम आल्याचा इतिहास आहे. प्रत्येक वर्षी या पुरस्काराचे आयोजन एम.डी.आर.टी. विमा प्रतिनिधी सतीश हानेगावे हे करतात.

### ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

**शिरूर अनंतपाळ, दि.२५ जानेवारी -**

येथुन जवळच असलेल्या होंडाळा येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी हभप. ब्रम्हचैतन्य गुरुवर्य हभप. नामदेव म



हाराज दापकेकर यांच्या मार्गदर्शनाखाली २९ जानेवारी ते ५ फेब्रुवारी या तारखे दरम्यान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात अनेक नामांकित किर्तनकारांचे समुपदेशन होणार आहे. यात हभप. मनोहर महाराज वसुरकर, हभप. गजानन महाराज होंडाळकर, हभप परमानंद महाराज हिप्परगेकर, हभप. माधव महाराज पंढरपूर, हभप. कैलास महाराज लिंगदाळ, हभप. नारायण महाराज उम्रजकर, गुरुवर्य हभप. नामदेव दापकेकर, हभप. माऊली महाराज सिंदगीकर, यांचें किर्तन होणार आहेत. यात सहभागी वैजनाथ गुडमे, बापुराव सुर्यवंशी, शिवाजी पांचाळ, गणपती सुर्यवंशी, आत्माराम खंडगावे, नामदेव गुडमे, निवृत्ती सुर्यवंशी, विश्वांभर सोनटक्के, धोंडीराम पांचाळ, बाबुराव फसमल्ले, सहशिक्षक संतोष जांबकर, सोनबा ईबितदार, माधव सुर्यवंशी, व सर्व गावकऱ्यांच्या व भजनी मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या सप्ताहाचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.



### प्रतीक्षाची लंगडी स्पर्धेसाठी निवड

**उदगीर, दि.२५ जानेवारी -**

मदुराई (तामिळनाडू) येथे होणाऱ्या राष्ट्रीय लंगडी स्पर्धेसाठी म. फुलेनगर उदगीर येथील प्रतीक्षा शिवकुमार कांबळे हिची वरिष्ठ गटात निवड झाली आहे. ही स्पर्धा ३१ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान होणार आहेत. शिर्डी येथे नुकत्याच झालेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत राज्य निवड मंडळाने तिची निवड केली. राज्यसचिव चेतन पागावाड यांनी प्रतीक्षाला निवडीचे पत्र दिले. यानिमित्त तिचे लंगडीचे जिल्हा सचिव जयराज धोतरे, मनपा जिल्हा सचिव मुजूब सय्यद, व्हॉलीबॉलचे राष्ट्रीय खेळाडू अशोक बुकटे, लंगडी प्रशिक्षक यशोदा पाटील, राज्यपंच साक्षी लोखंडे, क्रीडा शिक्षक ईस्माइल अत्तार, अश्लेषा गडदे यांनी अभिनंदन केले आहे.

### मुरलीधर माने यांचे निधन


**शिरूर अनंतपाळ, दि.२५ जानेवारी -**

उत्तर शेंद येथील मुरलीधर यशवंतराव माने यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी वृद्धप काळाने निधन झाले. यांच्या पश्चात यांच्या परिवारात दोन मुलं, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हे उदप शेंद या गावचे सरपंच देवा माने यांचे पिताश्री आहेत.

# दोन तालुक्याच्या सीमेवर असलेल्या शिऊर येथे मांजरा नदीतून बोटीद्वारे अवैद्य वाळू उपसा

मांजरा नदीतल्या अवैध वाळू... | उपश्याला कधी चाप बसणार?... | बोटी मांजरा काठावर स्थीरावल्या... | प्रशासनाच्या भूमीकेवरच शंका ?...







**तभा वृत्तसेवा / रियाज मोमीन**
**वलांडी, दि.२५ जानेवारी -**

सध्या मांजरापट्ट्यात अवैध वाळू उपसा व विक्रीचे खुलेआम धुमशान रंगले असून हिवाळ्यात हायवा गाडीचा धुराळा या अवैध वाळू उपसा व विक्रीचे साक्ष देत आहे.

देवणी, निलंगा तालुक्यातील सिमेवर असलेल्या शिऊर येथील मांजरा नदी काठावर अवैध वाळू उपसा वाढला असून रात्र-दिवस हा उपसा व विक्री चालूच असल्याने या धंदयाला वरदहस्त कोणाचा हा प्रश्न पूढे येत असून याला चाप बसणार का? असा सवाल उपस्थित होत आहे. शिऊर येथील मांजरा नदीच्या पात्रातून बोटीच्या साहयाने बिनदिक्कत वाळू उपसा केला जातो. या सर्व घडामोडीची माहीती प्रशासनातील अधिकारी, सत्ताधारी लोकप्रतिनिधी यांना असतानाही कार्यवाहीचे पाउल उचलले जात नाही ही मोठी शोकांतीका आहे.

जनू वाळूचे टेंडर सूटल्यागत दिवस-रात्र अवैध वाळूची वाहतूक केली जाते. याकडे सर्वच कानाडोळा करतात कारण हप्ते फार दांडगे असल्याने कारवाईचे पाऊल उचलले जात नाही.

त्यामूळे शिऊरच्या वाळू माफियाचा आका कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

**गिरकचाळ येथे कार्यवाही शिऊरला का नाही?**

निलंगा महसूल विभाग व स्थानिक गुन्हे शाखा लातूर यांच्या संयूक्त पथकाने निलंगा तालुक्यातीलच गिरकचाळ येथे ऑगष्ट महिन्यात मोठी कार्यवाही केली. पण शिऊर येथील वाळू माफीयावर कार्यवाहीसाठी अधिकारी व कर्मचारी धास्तावले कि आणखी काय ? हा संषोधनाचा विषय आहे.

**वाळूला सोन्यांचा भाव...**

सध्या बाजारात सोन्यांचे दर वाढलेले असताना सोने खरेदी सर्वसामान्य माणसाला खरेदी करणे आवाक्याच्या बाहेर असताना वाळूला सुध्दा सोन्यांचा भाव मिळाला असून या अवैध वाळू उपसा व विक्रीच्या संबंधित यंत्रणेने सर्वसामान्य माणसाला आपल्या घराच्या स्वप्न साकारणे अवघड होऊन बसले आहे.

**शासनाच्या लाखो रुपयाच्या महसूलावर पाणी...**

मांजरा नदीकाठच्या कोणत्याही गावात अध्याप पर्यंत शासनाच्या वतीने वाळू घाटाचा लिलाव टेंडर प्रकिया अधिसूची केली नसली तरी शिऊर येथील मांजरा नदी काठी दोन वाळू माफीया कडून राजरोसपणे बोटीव्दारे बेसूमार वाळूचा उपसा करण्यात येत आहे. यात शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडवला जात आहे. चार महिण्यापूर्वी यातील एका वाळू विक्रेत्यावर विषेश पोलीस महानिरक्षकाच्या पथकाने दोनदा कारवाही केली आहे. तर एकावर निलंगा महसूल पथकाने कार्यवाही करुन टिप्पर जप्त केला आहे. निवडणूका संपताच रात्री होणार वाळू उपसा अता दिवसाही चालू आहे. त्यामूळे निलंगा प्रशासनातील कोणाचा वरधास्त या दोन वाळू माफीयावर आहे. असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## बसवकल्याणमध्ये मंगळवारी शिवा संघटनेचा वर्धापनदिन

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२५ जानेवारी -**

शिवा अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक संघटनेचा ३० वा आणि सेवा जनशक्ती पार्टीचा द्वितीय वर्धापन दिनानिमित्त 'वीरशैव लिंगायत व बहुजनांचा भव्य मेळावा' मंगळवारी २८ जानेवारी रोजी कर्नाटक राज्यातील बसवकल्याण (जि. बिदर) येथे संपन्न होणार आहे.

महाराष्ट्र कर्नाटक-तेलंगणा राज्यातील अनेक गुरूवर्यांच्या सानिध्यात बसवकल्याण (जि. बिदर) येथे शिवा संघटनेचे संस्थापक प्रा. मनोहरराव धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन उमाकांत नागलगावे, संतोष खिंडे, महेश पाटील, आनंद अंकुलगे, युवराज बिराजदार, जितेंद्र शिवगे, रामेश्वर स्वामी यांनी केले आहे.

## ईव्हिएम हटाओ : चाकूर कॉंग्रेस कमिटीचे तोंडावर काळी पट्टी बांधून आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२५ जानेवारी -**

चाकूर तालुका व शहर कॉंग्रेस पार्टीच्या वतीने तहसिल कार्यालय येथे दि.२५ जानेवारी रोजी तोंडावर काळी पट्टी बांधून ईव्हीएम हटावा लोकशाही वाचवाच्या घोषणा देत निवेदन देण्यात आले.

२५ जानेवारी हा दिवस देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीमध्ये मतदार हा राजा असून देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी देशातील मतदार निवडणुकांमध्ये आपल्या मतदानाचा हक्क बजावीत असतात. भारतीय लोकशाही व्यवस्थेमध्ये निवडणूक आयोगाकडून भयमुक्त व निःपक्षपाती वातावरणात सर्व निवडणूका पार पडणे अत्यंत महत्वाचे व आवश्यक आहे.

निष्पक्ष व पारदर्शक निवडणुका घेणे निवडणूक आयोगाचे कर्तव्य आहे. पण सध्या निवडणूक आयोग ज्या पद्धतीने निवडणुका घेत आहे. त्यामुळे आयोगाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

लोकशाहीचे रक्षण तसेच मतदारांच्या हक्कासाठी प्रांताध्यक्ष नाना पटोले, राज्याचे माजी मंत्री आ. अमित देशमुख, खा.डॉ. शिवाजी काळगे, मा.आ. धिरज देशमुख, जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उडगे यांच्या सूचनेनुसार चाकूर तालुका कॉंग्रेस व शहर कॉंग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला. निवडणूक आयोगाने पक्षपातीपणा न करता निष्पक्ष व पारदर्शक निवडणुका घेण्याचे आपले कर्तव्य पार पाडावे तसेच लोकशाहिचे रक्षण आणि मतदारांचा, आदर सन्मान तसेच विश्वास कायम ठेवून विश्वासार्हता अबाधित राहील याकडे निवडणूक आयोगाने लक्ष घ्यावे, असे निवेदनांत म्हटले आहे.

निवेदनावर विलासराव पाटील चाकुरकर, पप्पुभाई शेख, गंगाधर केराळे, सलीमभाई तांबोळी, ॲड. डी.ओ. कोरे, तुकाराम येदले, गफूर मासुलदार, व्यंकटी माने, अर्जुने भुंजग, शंकरे सुभाष, अझहर सौदागर, अकबर पटेल आदींच्या स्वाक्षरीचे निवेदन देण्यात आले. यावेळी चाकूर पोलीस स्टेशनचे



पोलीस गोविंद बोळंगे, श्रीमंत आरदवाड उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्यात काही माहिन्यापुर्वी विधानसभा निवडणूक पार पडली होती. या निवडणूकीत जनतेतुन निकाल लागल्यानंतर संशय व्यक्त करण्यात येत आहे. लोकसभा निवडणूकीत सत्ताधारी पक्षाचे अनेक उमेदवार पराभूत झाले होते. अवघ्या सहा महिन्यात हे चित्र बदलले आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या मतदानाच्या टक्केवारीमध्ये मोठी तफावत आहे. अचानक मतदारांची संख्या सहा महिन्यात लाखात कशी वाढली. हा संशोधनाचा विषय आहे. त्यामुळे ईव्हीएम हटवून बलेट पेप वर निवडणूक घेण्याची मागणी आम्ही केली असल्याचे चाकूर कॉंग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष विलास पाटील चाकुरकर यांनी सांगितले.

## पशुसखींनी कार्यकर्तुत्वातून ओळख निर्माण करावी : प्रा.डॉ. गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२५ जानेवारी -**

शेळीपालन पारंपरिक पद्धतीने न करता प्रशिक्षित पशुसखी महिलांनी त्यास उद्योगाचे स्वरूप द्यावे. आत्मसात केलेल्या माहितीचा उपयोग करून अधिक अर्थप्राप्ती करावी. प्राप्त केलेले ज्ञान इतर शेळीपालकांपर्यंत पोहोचवावे. प्रगतशील शेळीपालक आणि क्षेत्रीय माहिती प्रसारक म्हणून एक ओळख पशुसखींनी जनमानसात स्वकर्तुत्वातून निर्माण करावी असे आवाहन प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा. डॉ. नंदकुमार गायकवाड यांनी अध्यक्षीय भाषणात केले.



माफसु, नागपूर आणि माविम, मुंबई यांच्यातील सामंजस्य करारानुसार उदगीर पशुवैद्यक महाविद्यालयात दि.२० ते २४ जानेवारी दरम्यान बीड जिल्ह्यातील २१ पशुसखीकरीता निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. समारोप प्रसंगी मंचावर बीड जिल्हा समन्वय अधिकारी सुखदेव चिंचोलीकर, प्रकल्प समन्वयक डॉ. धनंजय देशमुख, प्रकल्प सह-समन्वयक डॉ. नरेन्द्र खोडे, प्रशिक्षण समन्वयक डॉ. शरद आव्हाड, प्रशिक्षण सह-समन्वयक डॉ. मत्स्यगंधा पाटील, आणि डॉ. राम कुलकर्णी हे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. शरद आव्हाड यांनी तर सूत्रसंचालन डॉ. सुहासिनी हजारे यांनी केले. पाच दिवसीय प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या पशुसखींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. संवाद कौशल्य, उद्यमिता निर्मिती, विविध विस्तार कौशल्यासोबत आदर्श शेळीसंगोपन, मुल्यवर्धित पदार्थ निर्मिती, प्राथमिक उपचार यावर भर टाकणारे हे प्रशिक्षण श्रुंखलेतील उदगीर पशुवैद्यक महाविद्यालयात आयोजित होणारे दुसऱ्या टप्प्यातील चौथे प्रशिक्षण होते. माया खरात आणि रेखा वेडे या पशुसखींनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त करतांना प्रशिक्षण त्यांच्या उपजिविकेत मैलाचा दगड ठरेल असा आत्मविश्वास व्यक्त केला. आभार प्रदर्शन डॉ. संकेत नरवाडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. वेदांत पांडे, डॉ. अय्यान पाटील, व विस्तार शिक्षण विभागातील कर्मचारी यांनी अथक मेहनत घेतली.

## महावितरणला स्व. ठाकरे, बोस जयंतीचा विसर; तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२५ जानेवारी -**

शासकीय कार्यालय, शैक्षणिक संस्थांमध्ये राष्ट्रपुरुष यांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात यावे असे शासनाचे आदेश आहेत. तरी देखील अनेक संस्थांमध्ये महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजऱ्या केल्या जात नाही.

असाच प्रकार देवणी महावितरणने दि.३ जानेवारी रोजी स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे साहेब आणि स्वातंत्रसैनिक सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी केली नाही.

त्या संदर्भात संध्याकाळी असिस्टंट इंजिनिअर लिंबोने रवी जयंती का साजरी केली नाही. संदर्भात केलेला विडिओ पण उपलब्ध आहे.

अशांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कडक कारवाई करण्यासंदर्भातील मागणी देवणी शिवसेनेतर्फ करण्यात येत आहे. याची दखल तात्काळ घेऊन कार्यवाही करण्यात यावी अन्यथा देवणी शिवसेनेतर्फ आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन देवणी तहसीलदारांना देण्यात आले.

निवेदनावर शिवसेना शहरप्रमुख दिपक मळभागे, माधव तेलंगे, चेतन मिटकरी, विलास तोंडारे, विशाल डोंगरे सह अदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## वीरमाता स्कुलमध्ये आनंदनगरीची धमाल, सुवासिनींचा मेळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.२५ जानेवारी -**

रेणापूर येथील वीरमाता जिजाऊ प्रायमरी इंग्लिश स्कुलच्या प्रांगणात आनंदनगरीची धमाल अनुभवायला मिळाली. तर हळदी-कुंकवाच्या निमित्ताने सुवासिनींचा मेळा भरल्याने शाळा अक्षरशः गजबजून गेली होती. मोठ्या उत्साहात विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे स्टॉल मांडून आनंद साजरा केला.

तर परिसरातील सुवासिनींनी एकमेकींना तिळगूळ वाटत हळदीकुंकवासह वह्या व पेनांचे वाण वाटले.सदरील अभिनव उपक्रम दि.२४ जानेवारी रोजी पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन शिवाजी यमते, अंकुश गवळी व नेताजी खाडप यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला शिवाजी यमते, अंकुश गवळी, सुमीत्रा सुडे, शितल गड्डीमे, नेताजी खाडप, सविता खाडप, स्कुलमधील सर्व शिक्षक, पालक, विद्यार्थी, स्कुलबस ड्रायव्हर आदिंची उपस्थिती होती. स्कुलमधील विद्यार्थींनी विविध प्रकारच्या खादय पदार्थांची दुकाने थाटली होती.

यावेळी मान्यवराच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रुपाली कातळे यांनी केले. या आनंदनगरी कार्यक्रमात महिला, विद्यार्थी, शिक्षक, मातापालक यांनी विद्यार्थ्यांनी आणलेल्या खादय पदार्थांचा आस्वाद घेत मनमुराद आनंद लुटला.

## बळकट करण्यासाठी नवमतदारानी पुढाकार घ्यावा : प्रा.डॉ. धुमाळे

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२५ जानेवारी -**

लोकशाही बळकटीसाठी नवमतदारांनी पुढाकार घेऊन नव मतदार नोंदणी साठी व मतदानाची टक्केवारी वाढेल यासाठी जनजागृती करावी, असे आव्हान महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ. धुमाळे डी. के. यांनी यावेळी विद्यार्थाना मार्गदर्शन करते वेळीआव्हान केले.



शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्य शास्त्र विभागाच्या वतीने दि.२५ जानेवारी रोजी सांस्कृतीक सभागृहात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी मार्गदर्शन व मतदानाचे महत्त्व राज्यशास्त्राचे विभाग प्रमुख डॉ. धुमाळे डी.के. यांनी केले.

यावेळी विद्यार्थ्याना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण धालगडे यांनी ही मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धालगडे ए.बी. हे होते. यावेळी लेखप्रशासन विभाग प्रमुख प्रा. शेख एस.एल., रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. पांडूरंग मुठ्ठे, डॉ. अमोल इंगळे, प्रा.डॉ. शिंदे पी.आर. यावेळी उपस्थीत होते.

कार्यक्रमासाठी विद्यार्थी व स्वयंसेवक उपस्थित होते.

## निलंगा तालुका केमिस्ट असोसिएशनतर्फे रक्तदान शिबिर संपन्न; १३१ रक्तदात्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२५ जानेवारी -**

अखिल भारतीय तथा महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिष्ट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी आमदार जगन्नाथ शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त निलंगा तालुक्यात केमिस्ट असोसिएशनच्या वतीने रक्तदान शिबिर घेण्यात आले. निलंगा येथील जयभारत फार्मसी कॉलेज येथे ५४ रक्तदात्यांनी, औराद शहाजानी येथे ३७ रक्तदात्यांनी तर निलंगा महाराष्ट्र फार्मसी कॉलेज येथे ४० जणांनी असे एकूण १३१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन पोलीस उपाधीक्षक डॉ. नितीन कटेकर, तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, पोलीस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी, सपोनी विठ्ठल दुरपडे, प्राचार्य डॉ. भागवत पौळ, डॉ.एस.एस. पाटील, प्राचार्य डॉ.एम.एन. कोलफुके, पी.पी. गायकवाड, मुख्याध्यापक मोहन नटवे, बसवराज वलांडे, डॉ.डॉ. यदुनाथ चिद्रेवार, डॉ. मलिकार्जुन शंकद, डॉ. ज्ञानेश्वर कदम, डॉ. उद्धव जाधव, डॉ. सचिन बसुदे आदि मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ओम बाहेती, बालाजी थेटे, सोमनाथ आग्रे, वैभव पाटील, राजेंद्र धूत, बाबुराव महाजन यांच्यासह आदिंनी परिश्रम घेतले.

# हिंगोली जिल्हा कुष्ठरोगमुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत- जिल्हाधिकारी गोयल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**
जिल्ह्यात कुष्ठरोग स्पर्श जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. शिक्षण, आरोग्य व ग्रामपंचायत विभाग यांच्या समन्वयाने हे अभियान यशस्वीपणे राबवून हिंगोली जिल्हा कुष्ठरोगमुक्त करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आयोजित आढावा बैठकीत दिले.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत विविध उपक्रम घेऊन राबविण्यात येणार आहे. हे अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समन्वय समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. एस. शैलेजा स्वामी, सहाय्यक संचालक (कुष्ठरोग) डॉ. सुनील देशमुख, वैद्यकीय अधिकारी डॉ. मंगेश टेहरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण, डॉ. गणेश जोगदंड, डॉ. बालाजी भाकरे, शिक्षणाधिकारी (मा.) प्रशांत दिग्रसकर, उपशिक्षणाधिकारी नितीन नेटके यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गोयल म्हणाले, हिंगोली जिल्हा कुष्ठरोगमुक्त करण्यासाठी २६ जानेवारीच्या ग्रामसभेत कुष्ठरोग जनजागृती अभियान राबवावेत. या अभियानात सर्व नागरिकांना सहभागी करुन घ्यावे. कुष्ठरोग आजाराची लक्षणे असलेल्या व्यक्तींनी नजीकच्या शासकीय दवाखान्यात जाऊन तपासणी करुन बहुविध औषधोपचार घ्यावा आणि जिल्हा कुष्ठरोग मुक्त करण्यास मदत करावे, असे आवाहन केले.

सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. सुनिल देशमुख यांनी कुष्ठरोग जनजागृतीसाठी स्पर्श अभियान दि. ३० जानेवारी ते दि. १३ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या कालावधीत कुष्ठरोग निवारण दिन व पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून दि. २६ जानेवारी, २०२५ रोजी सर्व गावात ग्रामसभेमध्ये कुष्ठरोगाविषयी माहिती देऊन कुष्ठरोगाविषयीचे गैरसमज दूर करण्यात येणार आहे. यावर्षी आरोग्य विभागाने 'कुष्ठरोगाबाबत एकत्रितपणे जनजागृती वृध्दींगत करु, त्याबाबतचा गैरसमज दूर करु व कुष्ठरोगाने बाधित एकही व्यक्ती मागे राहणार नाही याची दक्षता दक्षता घेऊ' असे घोषवाक्य तयार केले आहे. या अनुषंगाने शाश्वत विकास ध्येयाच्या अंतर्गत केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट निश्चित केले आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी समाजातील सर्व कुष्ठरुग्णांना शोधून त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. गावपातळीवर शाळेमध्ये कुष्ठरोग बाबत रांगोळी, चित्रकला, निबंध लेखन यासह विविध उपक्रमाचे आयोजन करून जनजागृती करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# हिंगोलीत मांडूळाची तस्करी करणारे पाचजण ताब्यात

## पोलिस व वनविभागाच्या पथकाची कारवाई



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**
शहरालगत बळसोंड भागात मांडूळाची तस्करी करणाऱ्या पाच जणांना वन विभाग आणि पोलिसांचय संयुक्त पथकाने शुक्रवार दि २४ जानेवारी रोजी अटक केली आहे. त्यांच्याकडून एक मांडूळ जप्त केले असून अटक केलेल्या पाच जणांपैकी तिघेजण वाशिम जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे विदर्भातही मांडूळ तस्करी केल्याची शक्यता नाकारता येत नाही.

याबाबत वनविभागाने दिलेल्या माहितीनुसार शहरालगत बळसोंड येथे एका व्यक्तीकडे काहीजण मांडूळ विक्रीसाठी आणणार असल्याची माहीती वन विभागाला मिळाली होती. त्यावरून विभागीय वन अधिकारी डॉ राजेंद्र नाळे, सहाय्यक वनसंरक्षक सचिन माने यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिक्षेत्र अधिकारी मिनाक्षी पवार, विश्वनाथ टाक, लियाकत अली, गुन्हे शाखेचे सपोनि शिवसांब घेवारे, वन विभागाचे कर्मचारी एस एस चव्हाण, एस टी काळे, एस जे शिंदे, महादु शिंदे यांच्यासह पथकाने दुपारी डमी ग्राहक पाठविले.

यावेळी बळसोंड येथील विठ्ठल गायकवाड यांचय घरात मांडूळ आणून ठेवले होते. डमी ग्राहकाने मांडूळ पाहून सौदा पक्का केला. त्यानंतर वन विभाग व पोलिसांच्या पथकाने विठ्ठल यांचय घरावर छापा टाकला. यामध्ये वन विभागाने एक मांडूळ जप्त केले आहे. याप्रकरणी विठ्ठल गायकवाड, गजानन कांबळे, गजानन वाणी, नंदू वानखेडे, देवानंद कांबळे, यांच्याविरूध्द वन्यजीव अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. वन विभागाने त्यांना अटक केली आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपी असण्याची शक्यता असून त्यादृष्टीने माहीती घेण्याचे काम सुरू असल्याचे डॉ नाळे यांनी सांगितले.

# कृषी व्यवसायाला समृध्द करण्यासाठी दुग्ध व्यवसायाची महत्वाची भूमिका



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**
ही भूमी संत आणि महंताची भूमी असून संस्कृती प्रधानभूमी आहे. येथील कृषी व्यवसाय श्रेष्ठ आहे तसेच हे क्षेत्र 'सिल्क आणि मिल्क' साठी महत्त्वाचे आहे असे सांगून या चर्चासत्रामधील मिळवलेल्या ज्ञानाचा फायदा मराठवाड्यासोबतच महाराष्ट्राच्या विकासासाठी निश्चितच होईल असे मत व्यक्त करताना कृषी व्यवसायाला समृद्ध करण्यासाठी दुग्ध व्यवसायाची महत्त्वाची भूमिका आहे हे प्रतिपादन केले. परिसंवादाच्या बीज भाषणातून डॉ. राजेंद्र सिंह ठाकूर यांनी कृषी,आरोग्य, संस्कृती, पर्यावरण यावर आपले महत्त्वपूर्ण विचार मांडले. तसेच शाश्वत विकासाची ध्येय गाठण्यासाठी दुग्ध व्यवसायाच्या विकासाला चालना देणे गरजेचे आहे, असे मत कुलगुरू डॉ. इंद्र मनी यांनी व्यक्त केले.

येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान पुरस्कृत दुग्धशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक २५ जानेवारी २०२५ रोज शनिवारला सस्टेनेबल डेअरी डेव्हलपमेंट इन इंडिया या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदरील चर्चासत्राला अध्यक्ष म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कमलकिशोर काबरा हे उपस्थित होते तसेच संस्था सदस्य शिवप्रसाद काबरा व रमेशचंद्र मुंदडा उपस्थित होते. चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी येथील कुलगुरू डॉ. इंद्र मनी हे उपस्थित होते. प्रमुख बीजभाषक म्हणून जबलपूर येथील जवाहरलाल नेहरू कृषी विश्वविद्यालयातील शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र सिंह ठाकुर हे उपस्थित होते. सदरील चर्चासत्राचे प्रास्ताविक दुग्धशास्त्र विभाग प्रमुख व चर्चासत्राचे समन्वयक प्रो. डॉ. पांडुरंग गंगासागरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सचिन हाटकर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. प्रशांतकुमार जोशी यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. रमेश दळवी, एनसीसी विभाग प्रमुख मेजर पंढरीनाथ घुगे, डॉ. सोपानदेव खरात व एनसीसी विद्यार्थी उपस्थित होते.



**हिंगोली- नर्सी नामदेव येथे संत नामदेव महाराज यांचे परमशिष्य संत चोखामेळा यांचे संत नामदेव मंदिराशेजारी स्मारक उभारण्यात यावे अशी मागणी रिपाईचे जिल्हाध्यक्ष दिवाकर माने यांनी भाजपचे आ. तान्हाजी मुटकुळे यांचेमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे मागणी केली. छाया- विजय गुंडेकर**

# पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांचेहस्ते ध्वजारोहन, विविध बैठका

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**
राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री तथा हिंगोलीचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ हे दि. २५ व २६ जानेवारी, २०२५ रोजी हिंगोली दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

पालकमंत्री श्री. झिरवाळ हे शनिवार, दि. २५ जानेवारी रोजी सकाळी १० वाजता नाशिक येथून हिंगोलीकडे प्रयाण करतील व सायंकाळी ५ वाजता हिंगोली शासकीय विश्राम गृह येथे आगमन व राखीव. ५-१५ वाजता शासकीय विश्रामगृह येथून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मोटारीने प्रयाण. सायंकाळी ५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे आगमन व जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ च्या आढावा बैठकीस उपस्थिती. सायंकाळी ६.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथून प्रसाद गार्डन वसमत शहर येथे मोटारीने प्रयाण. सायंकाळी ७ वाजता वसमत येथे आयोजित पालकमंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल नागरी सत्कार कार्यक्रमास उपस्थिती. रात्री ७.३० वाजता प्रसाद गार्डन वसमत शहर येथून शासकीय विश्रामगृह हिंगोलीकडे प्रयाण. रात्री ९ वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथे आगमन व राखीव.

रविवार, दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ८.३० वाजता शासकीय विश्रामगृह हिंगोली येथून पोलीस कवायत मैदानाकडे प्रयाण करतील. सकाळी ८.५५ वाजता पोलीस कवायत मैदान येथे आगमन व प्रजासत्ताक दिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थिती राहतील. सकाळी ९.४५ वाजता पोलीस कवायत मैदान हिंगोली येथून पलटन हिंगोली येथील रक्तदान शिबिराच्या कार्यक्रम स्थळाकडे त्यांचे मोटारीने प्रयाण. सकाळी १०.१५ वाजता पलटन हिंगोली येथे आगमन व रक्तदान शिबीर कार्यक्रमास उपस्थिती. १०.४५ वाजता फलटन हिंगोली येथून पक्षीय कार्यालय हिंगोलीकडे मोटारीने प्रयाण. ११ वाजता कार्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती व जनसेवा कार्यालयास भेट, हिंगोली शहरातील पदाधिकाऱ्यांसोबत बैठक. दुपारी १२ वाजता आमदार तानाजी मुटकुळे यांच्या यमुना निवास, रामाकृष्ण नगर, बळसोंड निवासस्थानाकडे प्रयाण. १२.३० वाजता श्री. मुटकुळे यांच्या निवासस्थानी आगमन व राखीव. दुपारी १ वाजता श्री. तानाजी मुटकुळे यांचे निवासस्थान येथून नाशिककडे प्रयाण.

## संक्षिप्त वृत्त

### ४७ व्या कलमाचा नशाबंदी मंडळाकडून प्रसार

हिंगोली- ७६ व्या गणराज्य दिनानिमित्त, व्यसनमुक्तीचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य च्या वतीने वसमत येथे भारतीय संविधानातील लोकोपयोगी मार्गदर्शक अधिनियम ४७ चा नागरिकांमध्ये प्रचार आणि प्रसार करण्यात आला. भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा नशाबंदी मंडळाच्या उपक्रमात गौरी अंभोरे, आशा कुरवडे, योगिता पांचाळ, शिवकन्या अंभोरे, प्राची गायकवाड, पायल सवंडकर, नंदिनी पांचाळ, कोमल सवंडकर, गायत्री साळवे, सांची मोरे, अंजली आळणे, विद्या शिंदे, प्रतिज्ञा काळे, वैष्णवी साळवे, प्राची कांबळे, सारिका साळवे, अक्षरा पंढरकर, चांदणी अंभोरे, श्रद्धा चव्हाण, अस्मिता अंभोरे, आयोध्या साळवे, श्रद्धा साळवे, आदींनी योगदान दिले. यावेळी व्यसनमुक्ती चित्र प्रदर्शन करण्यात आले होते. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल, नशाबंदी मंडळाच्या जिल्हाध्यक्षा शुभदा सरोदे यांनी अधिनियमाचे विवेचन केले.

### राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त औंढ्यात बैठक



औंढा नागनाथ- जिल्हाधिकारी हिंगोली यांचे आदेशानुसार औंढा नागनाथ तालुक्यातील सर्व पर्यवेक्षक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये सर्व बुथवर १५ वा राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यासाठी विविध प्रकारच्या स्पर्धा (रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,गायन स्पर्धा, प्रश्न मंजुषा स्पर्धा, व निबंध स्पर्धा) सर्व महाविद्यालये व शाळेमध्ये घेण्यासाठी सुचित करण्यात आले. तसे आदेश सर्व शाळा महाविद्यालये यांना देण्यात आले.'मतदानासारखे काही नाही मतदान निश्चित करणारच' हे घोषवाक्य मुख्य विषय आहे. सर्व बि एल ओ यांना अवगत करण्यासाठी सर्व पर्यवेक्षक यांची बैठक घेऊन सविस्तर माहिती देण्यात आली.सदर बैठकीस मा.तहसीलदार हरिष गाडे, निवडणूक नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, अव्वल कारकून श्रीकृष्ण दराडे, महसूल सहायक नितेश कुळकर्णी, आपरेटर विनोद घोडके, सर्व पर्यवेक्षक यांची उपस्थिती होती.

# शांती विद्या मंदिरमध्ये आनंदनगरी



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, २५ जानेवारी**
औंढा नागनाथ तालुक्यातील शिरड शहापूर येथील श्री शांती विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेमध्ये आज दिनांक २५ जानेवारी रोजी आनंद नगरी उत्सव घेण्यात आला.

यामध्ये विद्यार्थ्यांनी ५५ स्टॉल लावले होते विद्यार्थ्यांनी अतिशय आकर्षक व चवदार असे वेगवेगळ्या पद्धतीचे पदार्थ बनवून आणले. ज्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांनी व पालकांनी तर सहभाग घेतलाच परंतु गावातील सुद्धा सर्व मंडळींनी या ठिकाणी भरभरून प्रतिसाद दिला. विद्यार्थ्यांकडून हे पदार्थ खरेदी केले व त्यांचा आस्वाद घेतला यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमासाठी शाळेचे प्राचार्य पी.एन.काळे, शिक्षक एस. पी. रोकडे, बी. ए.वाघमारे, आर.बी. जोगदंड, एम.टी.चव्हाण, एस एम. टाले, संभाजी जोगदंड, एन.एच. देव, श्रीमती के.डी.कंदारकर इतर सर्व शिक्षक वृंदांनी भरभरून सहकार्य केले.

# आयकर विभागाच्यावतीने मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**
आयकर विभाग नांदेड सुट या शाखेचे माहिती सत्राचे आयोजन शहरातील देव पॅलेस येथे संपन्न झाले यावेळी संभाजीनगर येथून उपायुक्त रवींद्र चव्हाण आणि नांदेडचे आयकर अधिकारी संजय इंगोले यांची उपस्थिती होती.

यावेळी आयकर अधिकारी संजय इंगोले यांनी सेवाभावी संस्था आणि चारिटेबलं ट्रस्ट यांना काय काय करावयाचे गरजेचे आहे याची माहिती प्रस्ताविकात दिली त्यानंतर सिए महेश बियाणी यांनी सेवाभावी संस्था आणि ट्रस्ट यांनी १२ अ, ब ची नोंदणी कशी करावी आणि नंतर त्याचे कायदेशीर पालन कसे करावे या बदल माहिती दिली तर सिए राजेश सोमाणी यांनी त्या सेवाभावी संस्था आणि ट्रस्ट चे अकाउंटिंग कसे करावे याची माहिती दिली आणि काय काय काळजी घयावी या बदल चांगली माहिती दिली यावेळी वेगवेगळ्या सेवाभावी संस्था चे सुमारे ८० पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम सुरवातीस सर्वांचे स्वागताने झाले आणि उपायुक्त रवींद्र चव्हाण यांनी अध्यक्षीय समारोप केला तर संजय इंगोले यांनी आभार प्रदर्शन केले. या माहिती सत्र यशश्वी करण्याकारिता अॅड दिलीप झंवर, अॅड अशोक डुब्बेवार, अॅड निलेश तापडिया, सिए महेश बियाणी, सिए राजेश सोमाणी, सुमित महाजन, सुनील झंवर, सिए संकेत सोमाणी, अमीर कुंदा यांनी केले तर कार्यक्रमचे सूत्रसंचालन अॅड पंकज जोशी यांनी केले.

# श्री खंडोबा देवस्थान यात्रा महोत्सव कोळसा शंकरपटाचे बक्षीस वितरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ जानेवारी**
श्री खंडोबा देवस्थान महोत्सव कोळसा तालुका सेनगाव जिल्हा हिंगोली जंगी शंकरपटाचे बक्षीस वितरण मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आ. रामराव वडकुते अशोकराव नाईक, परमेश्वर मांडगे, खंडबाराव काचगुंडे, दत्तराव तिडके, अॅड बाबा नाईक, विलासराव गिते, प्रकाश पाटील, अमृतराव शिंदे, संदीप कुंडगर घडीवाले, महादेव गीते, गंगारामजी फटांगळे, गोपालराव सातपुते, गोपाळ ढोणे, विकासराव शिंदे, राजेंद्र बेंगाळ, नारायणराव गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी यात्रा कमिटीचे भास्करराव बेंगाळ, अंकुशराव बेंगाळ, पुजारी श्री मंचकराव बेंगाळ, नशीबभाई, बबन पाटील, मल्हारी पावडे, रामप्रसाद भगत, वैजनाथ तोंडे, विलासराव वाव्हळ, मकसुदभाई, बंडू मुंगसे, किसनराव मुंगसे, गुलाबराव वाव्हळ, रमेश पोले यात्रा कमिटीचे सर्व सदस्य, परीसरातील शंकरपट प्रेमी गावकरी मंडळी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### जमीन संपादनासाठी शेतकऱ्याचे उपोषण
### प्रजासत्ताक दिनी शेतातच करणार उपोषण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जानेवारी**

लोणी सावंगी उपसा योजनेत संपादित होऊन शिल्लक राहिलेली जमीनही संपादित करावी. या मागणीसाठी शेतकरी विक्रम सुदाम उगले यांनी रविवारी (ता. २६) प्रजासत्ताक दिनी त्यांच्या शेतात उपोषण करणार असल्याचा इशारा जीहाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

शेतकरी विक्रम उगले यांनी निवेदनात म्हटले आहे कि, लोणी सावंगी उपसा योजनेत त्यांची केसापुरी शिवारातील गट नंबर २४५ मधील जमीन संपादित केली. सादर योजनेने संपादित केलेल्या जमिनिनिमुळे त्यांच्या जमिनीचे दोन भाग झाले. जमिनीच्या एका भागामध्ये कायम पाणी साचत असल्याने ती वहीती करता येत नाही. २०१३ पासून सदर जमीन पडीक पडलेली असल्याने मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. उर्वरित जमीन शासनाने संपादित करावी यासाठी वेळोवेळी अर्ज करून आत्मदहनाचा इशाराही दिला होता; परंतु शासन दरबारी याची कोणीच नोंद घेतली नाही. आर्थिक परस्थितीत हलाखीची असल्याने याच जमिनीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह होतो; परंतु तीच पडीक पडली आहे. यामुळे माझी उर्वरित जमीन शासनाने संपादित करून न्याय द्यावा या मागणीसाठी रविवारी (ता. २६) शेतातच उपोषण करण्याचा इशारा विक्रम उगले यांनी निवेदनात दिला आहे.



### लोकशाहीला बळकट करण्यासाठी मतदानाची टक्केवारी वाढली पाहिजे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जानेवारी**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र लोकप्रशासन व राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत पंधरावा राष्ट्रीय मतदान दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे उपस्थित होते ते म्हणाले २५ जानेवारी हा दिवस मतदान जागृती दिवस म्हणून पाळला जातो या दिवशी महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना देशाला व नागरिकांना दिली.त्यात मतदानाचा अधिकार दिला व त्या दिवसापासून सामान्य माणसाच्या मनावर देशाचे नेतृत्व निर्माण झाले मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. तरुणांनी या राष्ट्रीय कार्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला पाहिजे.लोकसभा विधानसभा व देशातील कोणतीही निवडणूक आल्यानंतर आपल्या मताचा अधिकार राष्ट्रासाठी दिलाच पाहिजे व देशाचा योग्य तो राजा निवडला पाहिजे .. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक व व विद्यार्थ्यांना मतदार प्रतिज्ञा देण्यात आली या लोकशाहीमध्ये प्रत्येकाने मतदान केलेच पाहिजे व आपला हक्क बजावला पाहिजे असा उद्देश ठेवून हा कार्यक्रम घेण्यात आला मतदारांची प्रतिज्ञा डॉ.श्रीधर आघाव यांनी दिली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉक्टर उत्तम साळवे डॉ जे के भालेराव, यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय काळे यांनी केले आभार डॉ.सुहास जोशी यांनी मानले सर्व सहकारी प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.



### आत्तम राठोड जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये बीड जिल्ह्यातून प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२५ जानेवारी**

तालुक्यातील बनेश्वर शिक्षण संस्था संचलित होळ येथील श्री होळेश्वर विद्यालयाचे शिक्षक आत्तम राठोड यांनी ५२ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये सलग ३ वर्ष राष्ट्रीय पातळीवर आणि चौथ्या वेळेस बीड जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला. त्यामुळे आता ते अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय विज्ञान शिबिरात सहभागी होतील.

त्याबद्दल संस्थेचे सचिव डॉ.नरेंद्र काळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्याध्यापक संजय पालकर, मुख्याध्यापक नंदा गोरे, मुख्याध्यापक देवानंद मुलदोडे, बाळासाहेब खोगरे उपस्थित होते. उत्तम राठोड यांनी टाकाऊ साहित्यापासून शैक्षणिक साहित्याची निर्मिती केली आहे. त्यांच्या या प्रयोगाला पारितोषिक मिळाले आहे. दरम्यान, आत्तम राठोड हे प्रयोगशील शिक्षक आहे. त्यांनी यापूर्वीही अनेकदा विज्ञान प्रदर्शनात पारितोषिके मिळविलेली आहेत. त्यांची विज्ञानपेटी गाजली होती.

### नेताजी सुभाषचंद्र बोस हे भारतीय स्वातंत्र्याचे महानायक होते–डॉ.हनुमंत सौदागर



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जानेवारी**

तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा, जय हिंद..! ही घोषणा देऊन भारतीय तरुणांना एकत्र करून आझाद हिंद सेनेच्या माध्यमातून भारत मातृभूमीला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी बलिदान देणारे सरसेनापती सुभाषचंद्र बोस म्हणजे भारतीय स्वातंत्र्याचे महानायक असल्याचे प्रतिपादन डॉ.हनुमंत सौदागर यांनी केले. ते महानायक सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय, सरस्वती महाविद्यालय व भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य विजयकुमार शिनगारे हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महानायक सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य शिनगारे म्हणाले की, भारतीय स्वातंत्र्यलढा हा महानायक सुभाषचंद्र बोस यांच्याशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करून राष्ट्र निर्माणसाठी विद्यार्थ्यांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.सीता केंद्रे त्यांनी तर आभार डॉ. नागेश कराळे यांनी मानले. यावेळी प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

## समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुकांची भव्य मिरवणूक



बीड : सज्जनगड येथून समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुकांची शोभायात्रा बीड शहरात शुक्रवार (दि.२४) रोजी काढण्यात आली. शहरातील सहयोगनगर भागातील सर्वेश्वर गणपती मंदीर परिसरातून या पादुकांची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते. ३० जानेवारीपर्यंत शहरात मुक्कमी राहणार आहेत. शोभायात्रेमध्ये जय जय रघुवीर समर्थ महाराज की जय.. जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. सुभाष रोड, माळीवेस, धोंडीपुरा, बलभिम चौक या भागात व्यापारी मंडळाच्या वतीने ही समर्थ पादुकांचे स्वागत करण्यात आले. पादुकांचे स्वागत प्रसंगी मार्गावर भव्य रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या तसेच सांप्रदायिक भजनी मंडळाचे वारकरी पथक या मिरवणुकीची शोभा वाढवत होते. (छाया–श्रीकांत कुलकर्णी)

## श्री संस्कार इंग्लिश स्कूल मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न;चिमुकल्या कलाकारांनी जिंकली प्रेक्षकांची मने

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२५ जानेवारी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन येथील श्री संत नामदेव महाराज सभागृहा समोर शुक्रवारी सायंकाळी मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील चिंचोली माळी येथील ग्रामीण भागातील अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या श्री संस्कार इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने आपल्या देखण्या शैलीत सुंदर नृत्य आविष्कार सादर केला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चिंचोली माळीच्या सरपंच सौ रोहिणीताई सुनील देशमुख या होत्या तर या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मा. रमेश भिसे साहेब, सचिव जनविकास सेवाभावी संस्था केज हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून रामचंद्र देशमुख, ॲड भुजंगराव गलांडे, माजी सुनील बापू देशमुख, ह .भ.प. आबा महाराज मेहकर, अशोक देशमुख, प्रमोद नखाते, ज्ञानेश्वर माऊली भांगे, कैलास भांगे, बापुराव तोंडे, संजय देशमुख, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब राऊत, मंगल रामभाऊ गलांडे, चंद्रकांत भुजबळ, बालाजी भिसे, पत्रकार ज्योतिराम सावंत, रविंद्र मेटे, सचिन साखरे हे होते.यावेळी बोलताना जनविकास सेवाभावी संस्थेचे सर्वेसर्वा मा. रमेश भिसे साहेब यांनी शाळेविषयी गौरवोद्गार काढले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या मुख्याध्यापिका सिमा काळे यांनी केले तर प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष अनिल गलांडे यांनी केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका सिमा काळे, शिक्षीका निलम जोगदंड, देशमुख मॅडम, खंदारे मॅडम, रेश्मा गायकवाड, प्रियंका शिंदे तसेच सेविका पुनम चंदनशिव यांनी कठोर परिश्रम घेतले.यावेळी गावातील व परिसरातील नागरिक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवमतदार हे देशाचे भविष्य –जिल्हाधिकारी अविनाश पाठक

### मतदार दिनानिमित्त निघाली रॅली



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ जानेवारी**

नवयुवक आणि नवमतदार येत्या काळात देशाचे भवितव्य आहेत त्यासाठी जनजागृती महत्वाची आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित रॅलीला हिरवी झेंडी दाखवून त्यांनी सुरुवात केली याप्रसंगी ते बोलत होते.या कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) शैलेश सुर्यवंशी , जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके ,नायब तहसीलदार सुरेंद्र डोके इतर अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे म्हणाले की , देश हा महासत्ता बनू पाहतोय राष्ट्रीय मतदार दिनाच्या जनजागृतीत नवयुवकांचा असलेला सहभाग पुढील निवडणूकीत बीडचे चित्र पालटून दाखवेल.

आज चंपावती विद्यालयामध्ये मतदान दिनानिमित्त मतदान जनजागृती विषयाशी संबंधित रांगोळी स्पर्धा घेण्यात आली . या स्पर्धेत २५ विद्यार्थिनींनी भाग घेतला होता . या प्रदर्शनास तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी भेट दिली.

रॅलीला जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रागंणातून सुरुवात होऊन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथुन समाज कल्याण कार्यालयाच्या प्रांगणात समारोप करण्यात आला . रॅलीच्या समारोप प्रसंगी चंपावती विद्यालयाची विद्यार्थीनी नम्रता तांबे म्हणाली की बीड जिल्हा हा आता केवळ उसतोड कामगारांचा जिल्हा राहिलेला नसून या जिल्हयाने उत्कृष्ट खेळाडू , उत्तम प्रकारचे अधिकारी निर्माण करुन बीड जिल्हयाला ख–या अर्थाने पुढे नेले असून आपली बीडकर अशी ओळख निर्माण करण्यासाठी प्रत्येक नागरिक आणि विद्यार्थ्यांनी दृष्टीकोण बदलला पाहिजे असे तीने आपल्या मनोगतात व्यक्त केले . उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी सन्मानचिन्ह देऊन नम्रता तांबे हिचा गौरव केला . राष्ट्रीय मतदार दिनाच्या रॅलीत विविध शाळेने उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला . कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन व समारोप उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी केले .

बीड तालुक्यात विविध ठिकाणी राष्ट्रीय मतदार दिनाच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते . शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी शपथ घेतली काही ठिकाणी विद्यार्थ्यांची भाषणे झाली . लोकशाही अधिकाधिक बळकट करण्याच्या दृष्टिकोनातून निवडणुकांना जेवढे महत्त्व आहे तेवढेच महत्त्व मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावणे या गोष्टीस आहे . त्यामुळे १८ वर्षावरील युवकांनी आपापली नावे मतदार यादीत नोंदवावी आणि लोकशाहीत सक्रिय सहभाग नोंदवावा असे यानिमित्ताने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आवाहन केले आहे.

## राज्यस्तरीय शालेय किक बोक्सिंग स्पर्धेत गायत्री शिंदे राज्यातून द्वितीय



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२५ जानेवारी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्त्रीय शालेय किक बोक्सिंग क्रीडा स्पर्धा झाल्या .यामध्ये कु. गायत्री हनुमंत शिंदे , वजन गट २४ सज्ञ मध्ये राज्यातून द्वितीय क्रमांक मिळवला तर कु.गायत्री नेमटे यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.प्रशिक्षक राम नेमटे यांनी त्यांना मार्गदर्शन केले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी गुणवत्ता सिद्ध केल्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

## किल्ले धारूर: रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने व्यापारी वर्गाचा आंदोलनाचा इशारा

### मेन रोडची दुरवस्था, व्यापारी त्रस्त, १४ फेब्रुवारीपासून मार्केट बंद करण्याची चेतावनी

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.**२५ जानेवारी

धारुर शहरातील मेन रोडचे दुरुस्तीकरण करण्यात न आल्यास व्यापारी वर्गाने मार्केट बेमुदत बंद करण्याचा इशारा दिला आहे. व्यापाऱ्यांनी मुख्याधिकारी नगरपरिषद यांना २४ जानेवारी रोजी दिलेल्या निवेदनात उल्लेख केला आहे की, मागील अनेक वर्षांपासून मेन रोड पूर्णतः खराब झालेले आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात दगड, माती आणि अन्य अपशिष्ट साचलेले आहे, ज्यामुळे व्यावसायिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.



निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते काशिनाथ चौक या बीचमधील रस्त्यावरून साधी मोटारसायकल गेल्यावर धुळीचे मोठमोठे लोट उभे राहतात. ही धूल वारंवार दुकानदारांच्या मालावर व खाद्यपदार्थांवर जाऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान करते. यामुळे अनेक व्यापारी श्वसनासंबंधी आजारांना बळी पडल्याचा आरोप करण्यात आला आहे, ज्यामुळे त्यांच्या कुटुंबांचाही विचार करावा लागतो.

व्यापारी संघटनेने अनेक वेळा तोंडी व लेखी स्वरूपात नगर परिषदेस तोंड तोंड उभे राहून या समस्यांविषयी जागरूक केले आहे, परंतु अद्याप एका ठोस उपाययोजनेची प्रतिक्षा असून, कोणतीही कार्यवाही झाली नाही.

व्यापाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे कर्तव्यात लवकरात लवकर कार्यवाही करण्याची विनंती केली आहे. अन्यथा, १४ फेब्रुवारी २०२५ रोजी मार्केट बंद करण्याचा आणि कार्यालयासमोर उपोषण करण्याचा निर्णय घेण्याचा इशारा देण्यात आला आहे.योग्य कृती न झाल्यास धारुर शहरातील व्यापारी वर्ग याबाबतीत मार्केट बेमुदत बंद करण्याचा इशारा दिला आहे.अशी माहिती निवेदनात दिली आहे.

या निवेदनावर व्यापारी संघटनेच्या अनेक सदस्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत, ज्या मध्येव्यापारी संघटनेचे अध्यक्ष अशोक जाधव, मदन धोत्रे, मयूर सावंत, यशवंत गायके, निलेश दुबे, कृष्णा भावठनकर, नितीन जाधव, अमर महामुनी, धीरज चिंचाळकर, सचिन संक्राते, शिवाजीराव ढगे, बाळू गुळवे, भरत शिंनगारे, रामजी तोष्णीवाल, महेश चिद्रावार, सिद्दिकभाई तांबोळी यांचा समावेश आहे.

माहितीस्तव:

– मा.आ.श्री.प्रकाशदादा सोळंके साहेब, माजलगांव मतदार संघ

– मा.खा.श्री.बजरंग (बप्पा) सोनवणे साहेब, बीड लोकसभा

– मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड


व्यापारी संघटनेची एकता आणि संघर्ष करण्याची तयारी ही शहरातील विकासाची एक खूण आहे. प्रशासनाने लवकरात लवकर आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यावसायिक वर्गाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

## राष्ट्रीय योगासन स्पर्धेत उत्रेश्वर पांचाळ ब्रांझ मेडल

### ● आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२५ जानेवारी**

ऑल इंडिया योगा व योगा कल्चर फाउंडेशन यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील योगासन स्पर्धेत येथील योगगुरू उत्रेश्वर पांचाळ गुरुजी यांनी ब्राँझ मेडल मिळवून व्दितीय क्रमांक पटकावला असून, त्यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



१७ ते १९ जानेवारी २०२५ रोजी पश्चिम बंगाल येथे ऑल इंडिया योगा व योगा कल्चर फाउंडेशन आणि वर्ल्ड योगा फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील योगासन स्पर्धेत ५० ते ६० वर्ष वयोगटातील स्पर्धा संपन्न झाल्या.त्यात अंबाजोगाई येथील योग गुरु उत्रेश्वर रामकिसन पांचाळ (मोरेवाडी) अंबाजोगाई यांचा भारतातून द्वितीय क्रमांक आला आहे. त्यांनी महाराष्ट्राला रौप्य पदक मिळवून दिले आहे.

दरम्यान त्यांची व्हिएतनाम येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे.अंबाजोगाई शहरालगत मोरेवाडी या ग्रामीण भागातील असणाऱ्या उत्तरेश्वर पांचाळ यांनी योग साधना करून स्वकर्तृत्वाच्या जोरावर मार्गक्रमण करत आहेत, मेहनत, जिद्द,चिकाटी,सातत्य व समर्पण भाव जपत योग साधना करत आहेत. ही गौरवास्पद बाब आहे. तसेच आपल्या देशाची संस्कृती सातासमुद्रापार नेऊन आपल्या देशाचे नाव उंचावत आहेत. योगाच्या प्रसार आणि प्रचारात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात जिल्ह्यामध्ये कार्यालय स्वच्छतेला प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २५ जानेवारी**

शंभर दिवसांच्या नियोजनात ७ सुत्री कार्यक्रमाचा अंमल करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्धारित केल्याप्रमाणे नांदेड जिल्हा प्रशासनाने कार्यक्रमाला धडाक्यात सुरुवात केली आहे. त्यानुसार जिल्हा स्थानावरील जिल्हाधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय ,यांची स्वच्छता प्रशासनाने सुरु केली आहे.

२४ व २५ जानेवारीला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी अनेक जिल्हास्तरावरील कार्यालयाला भेट देऊन स्वच्छता मोहिमेचा आढावा घेतला. या मोहिमेमध्ये उपविभागीय अधिकारी तहसीलदार व सर्व विभाग प्रमुख सहभागी झाले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नगर प्रशासन, निवडणूक, सामान्य प्रशासन, नियोजन विभाग, लेखा वित्त विभाग, आपत्ती व निवारण विभाग, उपविभागीय कार्यालय ,तहसील कार्यालय, याशिवाय नांदेड येथील विविध कार्यालयाची स्वच्छता मोहीम सुरू झाली आहे. दस्ताऐवजीकरण,संगणकीकरण, सात बंडलमध्ये विभागलेल्या संचिका, लेख्यांची विभागणी, याबाबत प्रत्येक कार्यालय स्वच्छता मोहीम पाळत आहे.

शंभर दिवसांचे नियोजन करताना दोन दिवसांपूर्वी महसूल विभागातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी बैठक घेतली. या बैठकीमध्ये त्यांनी ७ सुत्री कार्यक्रमाची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर शुक्रवार व



शनिवारी ही मोहीम मोठ्या प्रमाणात नांदेड मुख्यालयात राबविण्यात आली.

प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमानंतर सर्व कार्यालयात सात सूत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने सर्व विभागांना त्यांच्या वेबसाईट अपडेट करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. नागरिकांची सनद व दर्शनी माहिती अपडेट करण्याचे स्पष्ट आदेश देण्यात आले आहे. सूचनाफलक व अन्य बाबी अद्यावत करणे, कार्यालयामध्ये येणाऱ्या अभ्यागतांना, लाभार्थ्यांना, तातडीने आवश्यक मदत दिली गेली पाहिजे, अभ्यागतांसाठी बसण्याची योग्य व्यवस्था करण्यात आली पाहिजे, तक्रार निवारण्याची योग्य पद्धत कार्यालयात अस्तित्वात असली पाहिजे. कार्यालयीन कर्मचाऱ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजे. जिल्ह्याच्या विकासात, सहभागात, गुंतवणुकीत वाढ होईल अशा पद्धतीची कार्यालयीन व्यवस्था तयार करण्यात यावी, प्रस्तावांचा तात्काळ निपटारा व्हावा, प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावी. तसेच अधिकाऱ्यांनी आठवड्यातून दोन दिवस क्षेत्रीय भेटीसाठी राखीव ठेवावेत असे निर्देश देण्यात आले आहे.

त्यामुळे पुढील तीन महिने १०० दिवसाचा कार्यक्रम निर्धारित करण्यात आला आहे. या सर्व अंमलबजावणीचा दर आठवड्याला आढावा जिल्हाधिकारी स्वतः घेणार आहेत.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शुक्रवारी प्रत्येक कार्यालयाला भेट देऊन साफसफाई स्वच्छता अभियानाचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व उपविभागांना त्यांनी भेटी दिल्या. तसेच उपविभागीय कार्यालय तहसील कार्यालय या ठिकाणी देखील त्यांनी पाहणी केली. यानंतर जिल्ह्यातील कार्यालयाच्या आकस्मिक भेटीचे नियोजन करण्यात आले आहे.

# स्वारातीम' विद्यापीठाचा २७ वा दीक्षान्त समारंभ २९ जानेवारीला




**तभा वृत्तसेवा**
**नविन नांदेड,दि. २५ जानेवारी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा सत्ताविसावा दीक्षान्त समारंभ दि. २९ जानेवारी रोजी सकाळी ११:०० वा. विद्यापीठाच्या दीक्षान्त मंचावर पार पडणार आहे. महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती महोदय मा. सी.पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ होणार आहे. तसेच महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. चंद्रकांत दादा पाटील हे दीक्षान्त समारंभाचे सन्माननीय अतिथी राहणार आहेत. नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी उपाध्यक्ष व पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे प्रख्यात प्रा. मा. भूषण पटवर्धन हे सन्माननीय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, व्यवस्थापन परिषदचे सर्व सदस्य यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती असणार आहे. असे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डी.डी. पवार आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी कळविले आहे.

विद्यापीठातून सर्वाधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यास नांदेड चान्सलर सुवर्ण पदकाने सन्मानित करण्यात येत असते. यावर्षी हा बहुमान परभणी येथील बी रघुनाथ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. श्रद्धा हरहरे यांना मिळणार आहे. कु. श्रध्दा हरहरे यांना राज्यपाल महोदयांच्या हस्ते सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. याशिवाय इतरही ५१ विद्यार्थ्यांना सुवर्णपदक देवून सन्मानित करण्यात येणार आहे. सत्ताविसाव्या दीक्षान्त समारंभानिमित्त विद्यापीठ परीक्षेत्रातील चारही जिल्ह्यातील एकूण २१०५५ विद्यार्थ्यांना यावर्षी पदवी, पदविका प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. यामध्ये १८० विद्यार्थ्यांना विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रमाणपत्र दीक्षान्त समारंभाच्या दुपारच्या सत्रात मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे.

विद्यापीठातील सर्व संकुलातील विद्यार्थ्यांनी, विद्यापीठ उपकेंद्र लातूर संकुलातील विद्यार्थ्यांनी व न्यू मॉडेल डिग्री कॉलेज हिंगोली येथील ज्या विद्यार्थ्यांनी सत्ताविसाव्या दीक्षान्त समारंभासाठी उपस्थित राहून पदवी, पदविका घेण्यासाठी अर्ज सादर केले आहेत. अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठातील दीक्षान्त कक्ष विभागातून सकाळी ०८ ते १०:३० वा. दरम्यान पदवी प्रमाणपत्र वितरित केलेले जाणार आहेत. यावेळी दीक्षान्त मंडपात उपस्थित राहण्यासाठी विद्यार्थ्यांना विद्या शाखानिहाय ठरविण्यात आलेले उपरणे लेखा विभागातुन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी अनामत रक्कम लेखा विभागामध्ये जमा करावे लागणार आहे. त्यानंतरच संबंधितांना दीक्षान्त समारंभाच्या वेळेपुरते परिधान करण्यासाठी उपरणे दिले जाणार आहेत. दीक्षान्त समारंभ संपल्यानंतर उपरण्यासाठी जमा केलेली अनामत रक्कम पैकी उपरणे शुल्का पोटी रु. १०/- वजा करून उर्वरित शुल्क रक्कम परत करण्यात येणार आहे. यासाठी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रासाठी भरलेल्या शुल्काची मूळ पावती व स्वतःचे ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी आप-आपल्या महाविद्यालयामध्ये पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज केले आहेत. अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ पार पडल्यानंतर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या पदवी वितरण कार्यक्रमाध्ये पदवी प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### राजेश्वर कांबळे यांना जनहित दर्पण पत्रकारिता पुरस्कार जाहीर



**कंधार**-महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई आणि राजर्षी शाहू महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान, जवळा (दे) ता.लोहा जि.नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा यंदाचा 'राज्यस्तरीय जनहित दर्पण पत्रकारिता पुरस्कार' कंधारचे प्रख्यात पत्रकार राजेश्वर कांबळे यांना जाहीर झाला आहे. पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे. सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, भारतीय संविधानाची प्रत, शाल, श्रीफळ व पुष्पहार असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या २७ जानेवारीला सोनखेड ता.लोहा येथे होणाऱ्या तिसऱ्या राज्यस्तरीय जनहित ग्रामीण साहित्य संमेलनात हा पुरस्कार त्यांना प्रदान केला जाणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### सुवर्ण कन्या स्वाती गुव्हाडे यांचे विभागीय क्रीडा स्पर्धेत सुवर्णयश



**माहूर**-छत्रपती संभाजीनगर विभागातील नगर परिषदा व नगर पंचायतीच्या क्रीडा स्पर्धेत नांदेड जिल्ह्यातील माहूर येथील नगर पंचायतचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्वाती बबनराव गुव्हाडे यांनी एक उत्कृष्ट क्रिडापटू म्हणून विविध क्रिडाप्रकारात २ सुवर्ण व २ रौप्य अशी एकूण ४ पदके जिंकून नेत्रदीपक कामगिरी बजावली आहे. त्यांनी ३ किलोमीटर अंतर चालणे आणि समुह गित गायन या दोन्ही स्पर्धेत प्रत्येकी १ अशी २ सुवर्ण पदके तर थाळी फेक व गोळा फेक या दोन्ही स्पर्धेत प्रत्येकी १ अशी २ रौप्य पदके असे मिळून एकूण ४ पदके मिळवले. सुवर्ण कन्या स्वाती गुव्हाडे यांनी केलेल्या या नेत्रदीपक कामगिरी बद्दल नगरपंचायत माहूर येथे दि.२३ जानेवारी रोजी त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात नगराध्यक्ष फिरोज दोसाणी, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर लाड, मुख्याधिकारी विवेक कांदे व कार्यालय अधिक्षक तथा लेखापाल वैजनाथ स्वामी यावेळी मान्यवरांसह लेखापाल व लेखापरीक्षक विशाल मरेवाड,सहा.कार्यालय अधिक्षक संदिप गजलवाड, इंजिनिअर विशाल ढोरे,सहा.प्रकल्प अधिकारी देविदास जोंधळे,शहर समन्वयक शेख मजहर, गुंठेवारी विभागाचे विजय शिंदे, स्वच्छता विभाग प्रमुख गणेश जाधव,पाणी पट्टी वसुली प्रमुख कल्याण पाटील, मालमत्ता कर विभाग प्रमुख सुरेंद्र पांडे,शेख नयुम, विलास बोरकर, अविनाश बरडे, समाधान, सादिकभाई,प्रविन शेंडे,ज्योती नलावडे,शकीलाबी व ईतर कर्मचारी उपस्थित होते.

### हिमायतनगर येथील मेडिकल असोशियन कडून रक्तदान शिबिर



**हिमायतनगर**-हिमायतनगर शहरातील परमेश्वर मंदिर प्रांगणात दि.२४ जानेवारी मेडिकल असोसिएशन यांच्याकडून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रक्तदात्यांनी भरपूर प्रतिसाद देत रक्तदान केले. या रक्तदान शिबिरामध्ये ५० रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले. या रक्तदान शिबिरामध्ये रक्त संकलन करण्यासाठी नांदेड येथील जिजाऊ ब्लड बँक यांनी सहकार्य केले. यावेळी मेडिकल असोसिएशनचे तालुकाध्यक्ष शंकर पाटील, डॉ. शेषराव चव्हाण, डॉ. माने, डॉ. गायकवाड, डॉ. गणेश कदम, डॉ. रावते, डॉ. वानखेडे, डॉ.पवनेकर, डॉ.मुक्कावार, डॉ. शेवाळकर, डॉ. मिराशे, अमोल पेन्शनवार यासह अनेकजण उपस्थित होते.

# निवडणूक आयोगाची भूमिका पक्षपाती : खा. रविंद्र चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २५ जानेवारी**

निवडणूक आयोग स्वतंत्र संस्था आहे. राज्यघटनेने निवडणूक आयोगाला देशातील संपूर्ण निवडणूकांचे निर्देश आणि नियंत्रण करण्याचे अधिकार दिले आहेत. निवडणूक आयोगाने निष्पक्ष निवडणूका घेणे अपेक्षित आहे. मात्र अलिकडे निवडणूक आयोगाची भूमिका पक्षपाती दिसत आहे. लोकशाहीसाठी ही मारक भुमिका आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणूकीचे निकाल अनाकलनीय, आश्चर्यकारक व काही गडबड असल्याचे दिसते. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या अंतरात पन्नास लाख मतांची वाढ संशयास्पद वाटते. असे खा. रविंद्र चव्हाण यांनी म्हटले आहे.

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून राज्यभरासह शहरात देखील काँग्रेस पक्षाच्या वतीने निवडणूक आयोगाच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले. यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत खा. रविंद्र चव्हाण बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, मतदारांचाही विधानसभेच्या निकालावर विश्वास बसलेला नाही. आपले मतदान चोरले गेल्याची भावना जनतेत आहे. शेवटी जनतेची भावना महत्वाची आहे. यावेळी दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, श्याम दरक, सुरेंद्र घोडसकर, डॉ. श्रावण रँपनवाड, राजेश पावडे, केदार पाटील सांळूके, तिरुपती पाटील कोंढेकर, ज्येष्ठ नेते सुरेश गायकवाड, आनंद चव्हाण, अनिल मोरे, मसुद खान, महेश देशमुख तरोडेकर, प्रफुल्ल सावंत, विठ्ठल पावडे, गंगाधर सोंडारे, बालाजी चव्हाण, शमिम अब्दुला, जे.पी. पाटील, गंगाधर सोनकांबळे, अब्दुल गफार, सतिश देशमुख तरोडेकर, मुन्ना अब्बास, सुरेश हटकर, सत्यपाल सावंत, रहिम खान, अजिज कुरेशी, दिपक हुजुरीया, बापूसाहेब पाटील, मुन्तजिब, शंकर शिंदे, गोविंद पाटील, गणेश पाटील, अंबादास रातोळे आदीसह इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून राज्यभरासह शहरातील महात्मा जोतिबा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकाजवळ आयटीआय चौक येथे निवडणूक आयोगाच्या निषेधार्थ निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी निवडणूक आयोगाच्या विरोधात प्रचंड घोषणा बाजी करण्यात आली. यानंतर सविस्तर निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी काँग्रेस पक्षाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खा.चव्हाण यांच्याकडून भोकरच्या पत्रकारांचा अवमान

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. २५ जानेवारी**

तालूका पाणी टंचाई आढावा बैठकिचे आयोजन दि.२५ जानेवारी रोजी गणराज रिसोर्ट येथे करण्यात आले होते. या बेठकिस माजी मूख्यमंत्री खा. अशोक चव्हाण व आ. श्रीजया चव्हाण यांच्यासह शहरातील विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या बैठकिचे वार्तांकन करण्यासाठी शहरातील काही जेष्ठ पत्रकारांची उपस्थिती होती. बैठक चालू होण्यापूर्वी खा. चव्हाण यांनी ध्वनिक्षेपकांवरुन पत्रकारांना बैठकितून बाहेर जाण्यास फर्मावले दोन वेळा ध्वनीक्षेपकावरुन पत्रकारांना बैठकितून बाहेर जा असे म्हटल्याने नाराज झालेल्या पत्रकारांनी खा.चव्हाण यांनी पत्रकारांबद्यल केलेल्या वक्तव्याचा निषेध केला व तसे निवेदन राज्यपाल यांचेकडे तहसीलदार भोकर यांचे मार्फत पाठविण्यात आले.

निवेदनावर एल.ए.हिरे, बि.आर.पांचाळ, राजेश वाघमारे, बाबूराव पाटील, अनिल डोईफोडे, बि.एस.सरोदे, मनोज चौहाण, सिध्दार्थ जाधव, शेख लतीफ, अरुण डोईफोडे, जयभिम पाटील, शिवाजी गायकवाड ,कमलाकर बरकमकर, बालाजी नार्लेवाड, शंकर कदम ,दत्ता बोईनवाड, अहमद करखेलीकर, शंकर कदम, श्रीकांत देव, उत्तम कसबे, सूभाष नाईक, बोंदीरवाड, कैलास कानिंदे, विजय मोरे, गंगाधर नक्कलवाड, सूभाष तेले, शूभम नर्तावार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भाजपाच्या वतीने संविधान प्रस्ताविकेचे वाचन



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २५ जानेवारी**

संविधान गौरव अभियान निमित्त भारतीय जनता पार्टी नांदेड महानगरच्या वतीने भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संविधान प्रस्ताविकेचे वाचन करण्यात आले.

यावेळी माजी मुख्यमंत्री तथा भाजपा नेते खा. अशोक चव्हाण, आ. श्रीजयाताई चव्हाण, भाजपा महानगर कार्याध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजूरकर, भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, प्रविण साले, भाजपा महानगर सरचिटणीस तथा संविधान गौरव अभियानचे संयोजक साहेबराव गायकवाड, माजी सभापती किशोर स्वामी, विजय येवनकर, विजय गंभीरे, दिलीपसिंघ सोडी, किशोर यादव, बालाजी सूर्यवंशी, अभिषेक सौदे, राजू काळे, वैजनाथ देशमुख, मनोज जाधव, शशिकांत क्षिरसागर, संजय पांपटवार, प्रभु कपाटे, संजय इंगेवाड, धिरज स्वामी, बागड्या यादव, राज यादव, शकतारका पांढरे, महादेवी मठपती, डॉ. शितल भालकें, ठाकूर आदींची उपस्थिती होती.

# रक्तदान शिबीरास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,दि. २५ जानेवारी**

जेष्ठ सामाजिक व्यक्तिमत्व जगन्नाथ आप्पासाहेब शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाचे औचित्य साधून खडगांव(बेंद्री) येथील श्रीमती लताबाई पाटील फार्मसी महाविद्यालयांमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्धघाटन खा. रविंद्र वसंतराव चव्हाण यांनी केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाबुराव शिंदे, श्रीधर चव्हाण, शिवाजी पन्नासे, भास्कर शिंदे, प्राचार्य बाबुराव अनमुलवाड, मनोज देमेवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नांदेडच्या हुजूर साहेब ब्लड सेंटर बँकेच्या कर्मचाऱ्यांनी ब्लड संकलन केले असून यावेळी मेडिकल क्षेत्रातील कार्यकर्त्यांसह श्रीमती लताबाई पाटील.फार्मसी महाविद्यालयातीलअनेक विद्यार्थी विद्यार्थिनीने स्वयंस्फुर्तीने रक्तदान केले.

# अर्धापुर पोलिसांनी केला चार लाखाचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,दि. २५ जानेवारी**

तालुक्यातील गणपूर येथील एका घरात साठवलेला एकूण पावणेचार लाख रूपये किमंतीचा प्रतिबंधित गुटखा दि. २३ जानेवारी रोजी सायंकाळी अर्धापुर पोलीसांनी धाड टाकून पकडला. यातील एक आरोपी गजाआड केला असून न्यायालयाने त्याला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तर यातील दुसरा एक आरोपी फरार झाला आहे.



याबाबत पोलीसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, अर्धापुर तालुक्यातील मौजे गणपूर येथे शासनाकडून प्रतिबंधित केलेला गुटखा आरोपी नवनाथ दिगंबर गादेवार रा. गणपूर यांच्या घरामध्ये गुटखा असल्याची गुप्त माहिती पोलीसांना मिळाली. या माहितीवरून पोलीस निरिक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश कोरे यांच्या पथकाने दि. २३ जानेवारी रोजी सायंकाळी नवनाथ दिगंबर गादेवार यांच्या घरावर छापा मारला असता पोलीसांना प्रतिबंधित तंबाखू जन्य राजनिवास संगधीत पान मसाला,गोवा-१०००, वजीर संगधित पान मसाला, मुसाफिर, विमल, आर.एम.डी., रजनीगंदा आदी कंपनीचा एकूण ३ लाख ६७ हजार ९२६ रूपये किमंतीचा गुटखा सापडला. या प्रकरणात दोन आरोपी विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून यापैकी एक आरोपी नवनाथ दिगंबर गादेवार रा. गणपूर यांना पोलिसांनी अटक केली. तर दुसरा आरोपी साईनाथ बने हा मात्र फरार झाला आहे. या प्रकरणी सर्व मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला असून यातील आरोपी नवनाथ दिगंबर गादेवार याला दि.२४ जानेवारी रोजी अर्धापुर न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला चौदा दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. अर्धापूर पोलीसांच्या या धाडसी कारवाईचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# इस्लापूर येथील जलजिवन मिशनच्या बोगस कामांच्या तक्रारींकडे जिल्हाधिकारी लक्ष देतील काय?

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. २५ जानेवारी**

इस्लापूर येथील जलजिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे काम ठेकेदाराकडून अतिशय थातूरमातूर पद्धतीने, शासनाच्या मुळ अंदाज पत्रकाला बगल देऊन केले जात आहे. ही बाब तक्रार निवेदन देऊन जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही या गंभीर बाबींकडे त्यांनी विशेष लक्ष दिले नाही. आता सदरचे बोगस काम अंतिम टप्प्यात आल्यानंतर तरी जिल्हाधिकारी या बोगस कामांकडे लक्ष देतील काय? असा प्रश्न इस्लापूर गाववाशियांकडून उपस्थित केला जात आहे.

**गावकऱ्यांचा सवाल**

इस्लापूर येथील जलजिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजनेच्या बोगस कामा संबंधी भाजपचे जिल्हासचिव काशिनाथ पाटील शिंदे यांनी दि. ५ डिसेंबर २०२४, त्यानंतर दि. १९ डिसेंबर २०२४, व तसेच दि. ९ जानेवारी २०२५ अश्या प्रकारे तिन वेळेस पुराव्यासह तक्रार निवेदन मा. जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. नांदेड, जलजिवन प्राधीकरण विभागाचे अधीक्षक अभियंता यांची प्रत्यक्ष भेट घेऊन दिले आहेत. परंतू जिल्हाधिकारी नांदेड यांनी या बाबीची आजपर्यंत गंभीर दखल घेतली नाही. जलजिवन मिशन हा कार्यक्रम हा केंद्र व राज्य शासनाचा अत्यंत महत्वाकांक्षी कालबद्ध कार्यक्रम आहे. व तसेच सदर योजना विहित कालावधीत पुर्ण करण्याबाबतचे निर्देशही राज्य शासनाकडून देण्यात आले आहेत. उन्हाळ्याच्या प्रारंभावर पैनगंगा नदी कोरडेठाक पडली आहे. मग प्राधिकरण विभाग व ठेकेदार पैनगंगेवरून पाणी पुरवठा गावाला कसा करणार हे न उलगडणारे कोडेच ठरत आहे.शासनाच्या नियमावलीला खुंटीला टांगून ठेकेदार अतिशय बोगस काम उरकून जनतेच्या माथी मारण्यात यशस्वी होत आहेत. आता जिल्हाधिकाऱ्यांकडून संबंधित यंत्रनेची पाठराखण होत आहे की, काय? असा संतप्त सवाल गावकरी नागरीक उपस्थित करीत आहेत. ठेकेदार व प्राधिकरण विभागाचे अभियंता मात्र आपला उद्देश साध्य होत आहे असे मानून आपला एक कलमी कार्यक्रम पुढे चालवीत आहेत. म्हणून इस्लापूर येथील पाणी पुरवठा योजनेच्या बोगस कामांकडे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी तात्काळ लक्ष केंद्रित करून दोषी यंत्रणेवर कारवाईचा बडगा उगारूण, इस्लापूर गावाला कायमस्वरूपी पाणी पुरवठा योजनेच्या कामात सुधारणा करून, योग्य रितीने कामाला गती द्यावी. अशी मागणी गावकरी करीत आहेत.

# निवडणूक आयोगाच्या संदिग्ध भूमिकेबद्दल काँग्रेस आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २५ जानेवारी**



विधानसभा निवडणूकीत पन्नास लक्ष वाढलेली मतदारसंख्या तसेच मतदानाच्या दिनी रात्री वाढलेली शहात्तर लक्ष मते तसेच यासंदर्भातील बुथवरील व्हिडीओ फुटेज देण्यासाठी निवडणूक आयोग टाळाटाळ करीत असल्याने मुदखेड तालुका व शहर काँग्रेसच्या वतीने निवडणूक प्रक्रियेचा निषेध व्यक्त करण्यात आला.

लोकसभा निवडणुकीच्या नंतर राज्यात वाढलेली ५० लक्ष मतदारांची नोंदणी सर्वांनाच आश्चर्यचकित करणारी आहे. या शिवाय मतदानाच्या दिनी सायंकाळी ५ ते ११ दरम्यान झालेले ७६ लक्ष मतदान याविषयी संभ्रम निर्माण झाला असून संबंधित मतदानाचे व्हिडीओ फुटेज आता मिळणार नसल्याचे निवडणूक आयोग व केंद्र सरकारने सांगितले असल्याने संपूर्ण मतदान प्रक्रियेवर संदिग्धता निर्माण झाली आहे. या विरोधात

मुदखेड तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने दि. २५ जानेवारी रोजी तहसील प्रशासनास लेखी निवेदन देण्यात आले. तहसील प्रशासनाच्या वतीने विश्वनाथ बोधनवाड यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, काँग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे, कार्याध्यक्ष मोहमद गौस, युवक शहराध्यक्ष मुजिब पठाण, माजी नगराध्यक्ष राजबहादुर कोतावार, प्रा. संदीपकुमार देशमुख, माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे, करीम खान, जिल्हा उपाध्यक्ष राजू चौदंते, जिल्हा प्रवक्ते श्रीनिवास महादवाड, अतिक अहमद, सचिव माधव हामंद, उपाध्यक्ष दादाराव पाटील कल्याणे,सूर्यकांत चौदंते, लतीफ टेलर, आकाश सोनटक्के, सरपंच साहेबराव गोरखवाड, संजय बोकेफोड, यशवंत रणखांबे, अविनाश चौदंते, ऋषिकेश चौदंते, भगवान पवार, राजेश पवार, वेदांत शेवटे, नागोराव भांगे पाटील, गजानन संभोड, इकबाल कुरेशी, राधेश्याम ढगे, सुरेश ढगे, मोहम्मद युसूफ, मोईन भाई, खदीर भाई, गोविंद माळकोठे, यासह आदी उपस्थित होते.

**सौदाचिठ्ठी रद्द करण्या बाबतचे जाहीर प्रगटन**

माझे पक्षकार नामे अब्दुल खादर पि. मोहम्मद अब्दुल हाफिज रा. खडकपुरा ता. जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेस सुचित करण्यात येते की,

माझे पक्षकार यांच्या नावे मौजे म्हाळजा सर्वे नं. ६, गॅलक्सी पार्क मधील प्लॉट क्र. ए/२ व ए/३ स्थित म्हाळजा, माळटेकडी रोड, ता. जि.नांदेड येथे प्लॉट असुन, ज्याचे दोन्ही प्लॉट एकुण क्षेत्रफळ ४००० चौ. फुट असुन, ज्याची चतुःसिमा लेआऊट नकाशा प्रमाणे असलेले हे दोन प्लॉट माझे पक्षकार यांनी दि. १०/०२/२०२२ रोजी अजमतखॉन पि. गौहरखान रा. हिंगोली गेट, नांदेड यांना कायमस्वरुपी हे दोन्ही प्लॉट विकण्याचा करार केला होता, व सदरील सौदाचिठ्ठी / करारनामा रु. १००/- च्या मुद्रांक पेपरवर करुन दिला होता ज्याचा अ.क्र. ZG३२९४०६ असा असून, सदरील प्लॉटच्या सौदाचिठ्ठीची मुदत संपलेली असून, सुध्दा आज रोजी पर्यंत म्हणजेच दोन वर्षे झाले आहेत, तरी देखील अजमतखॉन हे सदरील प्लॉटचे नोंदणीकृत दस्त (रजिस्ट्री) जी काही ठरलेली रक्कम देवुन त्यांच्या नावे करुन घेतलेली नाही. त्या करीता माझे पक्षकार यांनी रजिस्ट्री करुन घ्या म्हणून श्री. अजमतखान यांना मोबाईल द्वारे तोंडी विनंती केली असता ते टाळाटाळ करीत आहेत सदरील प्लॉटचे कायदेशिर रित्या नोंदणीकृत खरेदीखत आजपर्यंत करुन घेत नाहीत. जी काही त्यांनी मला दिलेली रक्कम मी लिहुन घेणार श्री. अजमतखान पि. गौहरखान यांना परत करण्यास तयार आहे. व मला सदरील प्लॉट आज तारखे पासून म्हणजेच जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन सदरील प्लॉट इतरांना विक्री करणार आहे. व आज तारखे पासुन श्री. अजमतखान गौहरखान यांचा कोणत्याही प्रकारचा अधिकार राहणार नाही. व सदरील प्लॉटबाबत त्यांचा कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. कारण की, त्यांनी दिलेल्या मुदतीत सदरील प्लॉटचे खरेदीखत करुन घेतलेले नाही त्यामुळे सदरील सदरील सौदाचिठ्ठी करारनामा हा संपुष्टात आला असे जाहीर करण्यात येत आहे. करीता जाहीर प्रगटन.

मार्फत,
अॅड. विकास वाघमारे, नांदेड

जाहीर प्रगटन देणार
अब्दुल खादर पि. मोहम्मद अब्दुल हाफिज
रा. खडकपुरा ता. जि. नांदेड
मो. नं.८८८८८८९३२१